# कृषी विभाग, जिल्हा परिषद नाशिक चा सन २००७ - २००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल

जा.क्र.स्था-३/ब//जि.प./कृषी /नाशिक/१५१३

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांक- ३०.४.२००९

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

**प्रति,**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.

कृषी विभाग, जिल्हा परिषद नाशिक या विभागाचे सन २००७ - २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. सु. ध. ठाकरे, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा नाशिक यांनी दिनांक ९.१.२००८ ते १०.२.२००९ या कालावधीत पूर्ण केले. या अहवालावर श्री. उ. प्र. जोशी, लेखा परिक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी पुनर्विलोकन दिनांक २१.२.२००९ रोजी केले. श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी अंतिमीकरण केले.

लेखा परिक्षीत आर्थिक वर्षाच्या कालावधीत खालील प्रमाणे पदाधिकारी व अधिकारी या विभागाचे कामकाज पहात होते.

**अध्यक्षः-**

| | |
|---|---|
| श्री. राधाकिसन मारुती सोनवणे | दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**मुख्य कार्यकारी अधिकारीः-**

| | |
|---|---|
| श्री. ज्ञा. स. राजूरकर | दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**मा. कृषी सभापतीः-**

| | |
|---|---|
| श्री. शैलेश पवार | दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**कृषी विकास अधिकारीः-**

| | |
|---|---|
| श्री. एम. आर. वाघ | दिनांक १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

# भाग पहिला
# (मागील लेखा परीक्षण)

---

मागील लेखा परीक्षण अहवालातील खालील प्रमाणे परिच्छेद प्रलंबित असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयाकडे स्वतंत्ररित्या पत्र व्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | परि. संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९६७-६८ | १०२ | १ |
| २ | १९६८-६९ | १४४,१४७,१४९,१५२(ब)<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि. क्रमांक - १४९ (एडीई) - बंधारा वाहून गेल्याने झालेले नुकसान (३६) (२) ४६ | ४ |
| ३ | १९६९-७० | १३९ ( अ ते ड) | १ |
| ४ | १९७१-७२ | १६०,१६६ | २ |
| ५ | १९७२-७३ | १२० | १ |
| ६ | १९७४-७५ | ११८ | १ |
| ७ | १९७६-७७ | ९२ | १ |
| ८ | १९७७-७८ | ७,८ | २ |
| ९ | १९७९-८० | २१,२४ (ब)<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्रमांक २१ - बियाणे तोटा बाकी (५.३२५) | २ |
| १० | १९८०-८१ | ७,११(अ), ३(ब), १६, १९ (अ,ब,क) | ५ |
| ११ | १९८१-८२ | ४,५,१०,१४ | ४ |
| १२ | १९८२-८३ | ३,१६,१८,२१(ब),२२,२७,२८,३०,३१,३३ | १० |
| १३ | १९८३-८४ | ३ (अ, ब),९,११,१६,१७,१८ (१,२) | ६ |
| १४ | १९८४-८५ | ३,९,११,१८ | ४ |
| १५ | १९८५-८६ | ६,१०,११<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्रमांक १०- ५० टक्के अर्थसहाय्याने मळणी यंत्र पुरविणेबाबत (५.३१२)<br>परि.क्रमांक ११- पं.स. औजारे वाटप योजनेतील अनियमितता (५.४२९) (अ) (१०) | ३ |
| १६ | १९८६-८७-८८ | ३,४,२९,३०,३१,३४ | ६ |
| १७ | १९८८-८९ | ७ (१,२३), १०, १४(ब), १८ | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | १९८९-९० | ५,१२,१४ (१,२,४) | ३ |
| १९ | १९९०-९१ | ३,४ | २ |
| २० | १९९१-९२ | २८,३१ | २ |
| २१ | १९९२-९३ | ७,८,९,२८,३५ | ५ |
| २२ | १९९३-९४ | ६,७,१२,२०,२७,३१,३२,३६,३९,४७,५३,५५ | १२ |
| २३ | १९९४-९५ | ५,१२,२१,२२,२७ (६,७),३०(१), २५(१), (४ ते ८),३७ | ८ |
| २४ | १९९५-९६ | ५ (चांदवड गट वगळता), ११ (बागलाण व चांदवड गट वगळून ), १९ (६,७), ३५ (निफाड, कळवण व चांदवड वगळून) ४९ परिशिष्ट ८ पैकी (१,५,८),५०(१,२,४), १३,३१,५८ (पेठ वगळता) | ९ |
| २५ | १९९६-९७ | ४,७,११,२७(२,३),२८,३१,३८,४१,४२,४४(इगतपुरी गट वगळता) | १० |
| २६ | १९९७-९८ | ९ (१,३) (येवला व चांदवड गट वगळून , १५ (१,३), २३,२८, ३३,३५,४८ (कळवण, इगतपूरी, निफाड, चांदवड, दिंडोरी) | ७ |
| २७ | १९९८-९९ | ३,५(१,२),९(२,३),१६,४३(३) | ५ |
| २८ | १९९९-२००० | ३,१२,२८<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्रमांक २८ - बायोगॅस सिमेंट वसुली (३.३३७) (१) | ३ |
| २९ | २०००-०१ | ३,४ (१,४) (इगतपूरी वगळून), ७,१६,२४<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्रमांक ७ - अर्थसंकल्पिय तरतुदीपेक्षा कमी जादा खर्चाबाबत (३.५६३(६))<br>परि.क्रमांक १६ - टी. एस. पी. ओ. टी. एस. पी. माडा व वि.घ.यो. योजना राबवितांना केलेले अनियमिततेबाबत. (३.३९८) | ५ |
| ३० | २००१-०२ | ६,११,१६,१९,२२,३५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ परि.क्रमांक- ६ बायोगॅस योजनांतर्गत पुरविलेल्या सिमेंटचे येणे रक्कमाबाबत ३.५२७(६) | ६ |
| ३१ | २००२-०३ | ४,१०,११,२३,२४,२८,३३,३५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि. क्रमांक ११ - घोषीत केलेल्या जैविक खतांचा पुरवठा केलेबाबत. (३.३०(१))<br>परि. क्रमांक २४ - पूर्ण झालेल्या एस. सी. व्ही. (ओटीएसपी) विहीरी बाबत. (३.४७१ (८))<br>परि. क्रमांक २८ - बायोगॅस योजनेतंर्गत गटांना पुरविलेल्या सिमेंटच्या थकबाकी रक्कमांबाबत. (३.४७५)(६) | ८ |
| ३२ | २००३-०४ | ३,५ (१,३,४),६ (१),७(१,२,३,४,५,६,७),९ (१),१२(२(अ,ब),३) | ६ |
| ३३ | २००४-०५ | ३,४,९,१०,१३,१४,१५,२० | ८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | २००५-०६ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६(१), १७,१९, २०,२१, २२,२३,२४,२५<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि. क्र. ३ - ५० टक्के अनुदानातून शेतक-यांना सुधारीत शेती अवजारे पुरविणे (३.७९३)<br>परि. क्र. ४ - ५० टक्के अनुदानातून शेतक-यांना पीक संरक्षण अवजारे पुरविणे ( ३.७९४)<br>परि. क्र. ५ - ५० टक्के अनुदानावर शेतक-यांना ताडपत्री पुरविणे (३.७९५)<br>परि.क्र.१४ - आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील दारिद्रय रेषेखालील शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्यांची योजना राबवितांना झालेल्या अनियमिततांबाबत (३.७९६)<br>परि.क्र. १६(१) - केंद्र / राज्य पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य योजनेतून खरेदी सुधारीत शेती अवजाराबाबत.(३.७९७) | २२ |
| ३५ | **२००६ - २००७** | | |
| परि. क्रमांक ३ - युरिया ब्रिकेट ५० टक्के अनुदानावर खताचा पुरवठा योजना राबविण्यांतील अनियमितता. | | | |
| परि. क्रमांक ४ - डाळींब फळ पिकावरील जीवाणूजन्य तेल्या रोगाच्या नियंत्रणासाठी ५० टक्के अनुदानावर पीक संरक्षण औषधांचा पुरवठा करणे. | | | |
| परि. क्रमांक ५ - लोकरीमावा नियंत्रणाची औषधे साखर कारखाना मातेरेवाडी यांना देणेबाबत. | | | |
| परि. क्रमांक ६ - सौर कंदील वाटप योजनेतील अनियमितता बाबत. | | | |
| परि. क्रमांक ७ - एकाच कुटुंबातील व्यक्तिंना योजनेचा लाभ देणेतील अनियमितता. | | | |
| परि. क्रमांक ८ - सौर कंदील वाटप बाबत. | | | |
| परि. क्रमांक ९ -पंचायत समिती सुरगाणा भात बियाणे व युरिया ब्रिकेटस वाटप योजनेच्या प्रस्तावातील त्रृटीबाबत. | | | |
| परि. क्रमांक १० - प्रलंबित अग्रिम रक्कम वसुल करणेबाबत. | | | |
| परि. क्रमांक ११- जातीचे वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याबाबत. | | | |
| परि. क्रमांक १२ - अभिकरण शुल्काची रक्कम कमी कपात केलेबाबत. | | | |
| परि. क्रमांक १३ - केंद्र पुरस्कृत ऊस विकास कार्यक्रम अंतर्गत २५ टक्के अनुदानावर वखर पुरविणेच्या योजनेतील अनियमितताबाबत. | | | |
| परि. क्रमांक १४ - बायोगॅस अनुदानाबाबत. | | | |
| परि. क्रमांक १५ - कृषी / विस्तार अधिकारी यांच्या दैनंदिन्या प्राप्त नसतांना त्यांचे वेतन व भत्ते प्रदान करुन केलेली अनियमितता. | | | |
| परि. क्रमांक १६ - विहीर बांधकामाबाबत. | | | |
| परि. क्रमांक १७ - बायोगॅस सयंत्र अनुदान वाटप योजनेतील अनियमिततेबाबत. | | | |
| परि. क्रमांक १८ - ऊस विकास/गळीत धान्य /कडधान्य / मका उत्पनादन कार्यक्रम अंतर्गत असलेल्या औजारांबाबत. | | | |

| |
|---|
| परि. क्रमांक १९ - अपारंपारीक उर्जास्त्रोत विकास कार्यक्रम एकात्मिक ग्रामिण उर्जा नियोजन पश्चिम घाट विकास व आदिवासी उपयोजना कार्यक्रम अंतर्गत उर्जा बचत साधनांचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविणेबाबत. |
| परि. क्रमांक २० - दारिद्रय रेषेखालील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेतक-यांना कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देण्याच्या योजनेबाबत. |
| परि. क्रमांक २१ - दारिद्रय रेषेखालील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासी शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याच्या योजनेबाबत. |
| परि. क्रमांक २२ - अनुदान निर्धारणाबाबत |
| परि. क्रमांक २३ - राष्ट्रीय बायोगॅस योजनेच्या अकार्यक्षम अंमल बजावणीबाबत. |
| परि. क्रमांक २४ - राष्ट्रीय बायोगॅस योजनेच्या अकार्यक्षम अंमल बजावणीबाबत. |
| परि. क्रमांक २५ - बायोगॅस संयत्राबाबत. |
| परि. क्रमांक २६ - जामिनदार हयात व लायक असलेबाबतचे दाखले नाहीत. |
| परि. क्रमांक २७ - आक्षेप विवरणपत्र. |
| परि. क्रमांक २८ - विवरणपत्र |
| परि. क्रमांक २९ - लेख्यांची स्थिती. |
| परि. क्रमांक ३० - अनुपालन व पोहोच. |

**टिप-** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांच्या संदर्भात त्या-त्या वर्षाचे पुढील अभिप्रायांमध्ये नमुद करण्यांत आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यांत यावेत.

# भाग दुसरा

## स्थानिक क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(अ) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १ :- जिल्हा परिषद सेस मधुन शेतक-यांना ५० टक्के अनुदानावर शेती औजारे पुरविणेबाबत.**

**तरतुद** रुपये ९,९९,०००/-
**प्रशासकीय मान्यता-** जिल्हा परिषद, स्थायी समिती ठराव क्रमांक ११ दिनांक २०.६.२००७ व क्रमांक ८३ दिनांक १३.२.२००८
**तांत्रिक मान्यता-** विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक कडील जा.क्र. विना/कृ.१३/ नियोजन ४८०८/०७ दिनांक ३०.६.२००७
**पुरवठादार -** मा.विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, मर्यादित नाशिक.
**पुरवठा आदेश-** मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र.शेतकी/ब-३/सेस/४५०/०७ दिनांक ३०.६.२००७
(५१ इंची लोखंडी नांगर दर रुपये-२,२०६, पैकी अनुदान रुपये-११०३ व लाभार्थी हिस्सा रुपये-१,५६५/-, एकूण पैकी नग ८४४)
(विनोईंग फॅन दर रुपये-१,१८२/- पैकी अनुदान रुपये-५९१ लाभार्थी हिस्सा ६७३, एकुण नग ११५)

**खर्चाचा तपशिल-**

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक/ दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २३०/६.११.२००७ | ९७,९६५ | विनोईग फॅन |
| २ | २३१/६.११.२००७ | ९,३०,९३२ | लोखंडी नांगर |
| | **एकुण---** | **१०,२८,८९७** | |

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) कृषी विकास अधिकारी यांच्या दिनांक ४.७.२००७ रोजीच्या टिपणीनुसार एम.एस.एस. आय.डी.सी. व एम.अे.आय.डी.सी. चे शासकीय दर हे अनुक्रमे रुपये-२,२०६ व २,६६८ असून महाराष्ट्र शासनाने विनोईग फॅन चे दर रुपये-१,१८२/- स्विकृत केलेले आहेत. एम.अे.आय.डी.सी. च्या औजारांवर गुणनियंत्रणाचे काम एम.अे.आय.डी.सी. स्वतः करीत असल्यामुळे वेळेवर व गुणवत्तेचा (सप्लाय) पुरवठा होतो. सदर योजनेमध्ये रु. २,२०६/- या दरानेच एम.अे.आय.डी.सी.

पुरवठा देणार आहे, व लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदानांवर रुपये-१,१०३/- दरानेच औजाराचे वाटप होणार आहे, असा खुलासा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना कृषी जिल्हा अधिकारी यांनी केलेला आहे. प्रत्यक्षांत एम.अे.आय.डी.सी. कडून रुपये-२,६६८/- या जास्त दराने औजारे खरेदी केलेली आहेत.

२) निफाड गटाने दिनांक ८.५.२००७ रोजी ५१ इंजी लोखंडी नांगर २० नग मागणी केलेली आहे. मात्र पुरवठा १२० नगांचा करणेत आलेला आहे. त्यावर निफाड गटाने २० नांगरच वाटप केले उर्वरित १०० नांगर पत्र क्रमांक शेतकी/ब-३/६६९/०७ दिनांक १८.९.२००७ अन्वये नांदगांव गटाकडे वर्ग करण्यांत आले. निफाड गटाची मागणी नसतांना जादा देण्यांत आले.

३) दिंडोरी गटाने दिनांक ५.६.२००७ अन्वये ५१ इंजी लोखंडी नांगर १० नग मागणी केलेली असतांना पुरवठा आदेशामध्ये ७३ देऊन एकुण ६३ नग जादा पुरवठा केला. त्यावर दिंडोरी गटाने ६ नग वाटप केले व उर्वरित ६७ नग कळवण गटांस वर्ग केले.

४) इगतपूरी गटाने दिनांक १५.५.२००७ अन्वये ६१ नगाची मागणी केली व तेवढा पुरवठा करणेत आला, परंतू वाटप फक्त १ नगाचे करण्यांत आले व उर्वरित ६० नग सिन्नर गटाकडे वर्ग करणेत आले.

५) त्र्यंबक गटाने पत्र दिनांक ५.६.२००७ अन्वये ३८ नगाची मागणी केली व तेवढा पुरवठा करणेत आला. परंतू वाटप काहीही करण्यांत आले नसुन सर्व ३८ नग देवळा गटाकडे वर्ग करणेत आलेले आहेत.

६) नाशिक गटाने एकुण ५० नगाची मागणी केलेली असतांना वाटप काहीही नकरता सर्वच्या सर्व नग कळवण गटाकडे वर्ग करणेत आलेले आहेत.

७) पेठ गटाची ४६ विनोईग फॅन मागणी केलेली आहे व पुरवठाही केलेला आहे. मात्र वाटप फक्त ६ नग करणेत आले व उर्वरित ४० नग सुरगाणा गटाकडे वर्ग करण्यांत आले आहेत.

सुधारीत शेती औजारे पुरविणेबाबतचे योजनेच्या प्रारुपामध्ये औजारांची मागणी करतांना पंचायत समिती स्तरावर लाभार्थी यादी तयार करुन म. गट विकास अधिकारी यांचे मार्फत निवड करुन त्यानुसार मागणी करणे आवश्यक असतांना उपरोक्त पंचायत समित्यांनी कोणतीही लाभार्थी निवडीची प्रक्रिया न करता अंदाजीत मागणी केल्याचे व मागणीपेक्षा काही गटांना विनाकारण अतिरीक्त पुरवठा केल्याचे स्पष्ट होते.

मा. कृषी संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रक) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचकडील जा.क्र.सी.पी.एस./सु.कृ.औ./द.नि./०६-०७/३४/गुनि-५ दिनांक १७ मार्च २००७ अन्वये शेतक-यांची मागणी व पसंती विचारात घेता गुणवत्ता चांगली असल्याबाबत शेतक-यांची खात्री झाल्यांस आणि अशा औजारांची किंमत जादा असल्यांस त्यास शासनाची हरकत नाही. शेतक-यांच्या मागणीनुसारच खरेदी करण्यांस हरकत नाही. परंतू अनुदान हे फक्त दरकरारातील प्रपत्राच्या शेवटच्या रकान्यांत दर्शविल्याप्रमाणे ग्राहय धरण्यांत यावे व जादाची रक्कम ही शेतक-यांने भरावयाची आहे.

मात्र उपरोक्त नांगराची व फॅनची खरेदी करतांना गटस्तरावर लाभार्थी निवडच झाली नाही, हे कमी / जास्त पुरवठा व औजारे वाटप यावरुन स्पष्ट होते. मग यामध्ये शेतक-यांची पसंती घेतली कशी ? फक्त गटांकडील कृषी अधिकारी यांनी पारस नांगर मागणी केल्याने तसा पुरवठा आदेश विभागाने दिला आहे. त्यातही कृषी विभाग अधिकारी यांनी रुपये-२,२०६/- या

एम.अे.आय.डी.सी. पुरवठा करणार आहे हे वरील १ प्रमाणे टिपणीत नमुद करुनही प्रत्यक्षांत रुपये-२,६६८/- या जादा दराने खरेदी झाली आहे. त्यामुळे शेतक-यांना नाहक रुपये-३,८९,९२८/- चा भुर्दंड बसला आहे. त्यामुळे योजना एकुण रुपये-१९,९५,४९२/- ची असतांना रुपये-२३,९७,१५२/- ची म्हणजेच रुपये-४,०१,६६०/- ने योजना जादा रक्कमेने वाढली आहे. याबाबत विभागाने योजना राबवितांना शेतक-यांची पसंती व मागणी न घेताच जास्त रक्कमेचे औजारे खरेदी करुन योजना राबविली याबाबत जिल्हा परिषद सभेची मंजूरी घेवून अनुपालन दर्शवावे.

गटांकडील ५१ इंजी नांगराची मागणी नग ७६९ असतांना पुरवठा एकुण ८४४ नगांचा म्हणजेच ७५ नग जादा खरेदी केलेली आहे. त्याबाबतही सर्वसाधारण सभेचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्त बाबींची पूर्तता करणेत यावी. तो पर्यत खर्चाची रक्कम रुपये-९,९८,८९७/- लेखा परीक्षणामध्ये आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
जिल्हा परिषद सेस
आक्षेपाधीन रक्कम रुपये-९,९८,८९७/-

(विवरणपत्र क्रमांक ८ चा अ.क्र. "१" पहा)

---

## परिच्छेद क्रमांक २ :- जिल्हा परिषद सेस अंतर्गत शेतक-यांना ५० टक्के अनुदानावर ताडपत्र्या पुरविणेबाबत.

कृषी विभाग , जिल्हा परिषद नाशिककडून सन २००७-०८ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत ५० टक्के अनुदानांवर शेतक-यांना पुरवठा करण्यासाठी ताडपत्र्या खरेदी करण्यांत आलेल्या आहेत. त्यासाठी रुपये-४,९८,७६०/- ची तरतुद करण्यांत आलेली असून खर्च ही रुपये-४,९८,७६०/- करण्यांत आलेला आहे.

याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**प्रशासकीय मंजूरी-** (ठराव क्रमांक १७७ दिनांक ३०.४.२००७) म.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे आदेश क्र.शेतकी/ब-३/सेस/ ३५०/२००७ दि.१९.१०.२००७

**तांत्रिक मंजूरी -** म.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्र.शेतकी/ब-३/सेस/३८४/२००७ दिनांक ३०.५.२००७

**योजनेचा हेतू व महत्व -** शेतक-यांचे शेतामधील पीक मळणी, धान्य साठवण तसेच धान्याला पाऊस पासुन संरक्षण व कांदे/ गवत झाकणे, तसेच शेतीच्या कामासाठी उपयोगी असल्याने अनुसूचीत जाती / जमातीच्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल.

**पुरवठादार -** मे.डेझी ट्रेडींग कार्पोरेशन, मुंबई - ३

**पुरवठा आदेश क्रमांक-**शेतकी/ब-३/जि.प.सेस/४१२/०७ दिनांक १८.६.२००७

नाशिक जिल्हयांतील प्रत्येक तालुक्याने नोंदवलेली मागणी तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | गटाचे नांव | मागणी संख्या | मागणीपत्र दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | २० | ९.४.२००७ |
| २ | इगतपूरी | २५ | १५.५.२००७ |
| ३ | सिन्नर | ३० | १७.५.२००७ |
| ४ | निफाड | ५० | ९.५.२००७ |
| ५ | मालेगांव | ४५ | २४.५.२००७ |
| ६ | सटाणा | ३० | १.६.२००७ |
| ७ | कळवण | २५ | १४.५.२००७ |
| ८ | येवला | २० | ८.५.२००७ |
| ९ | नांदगांव | १५ | ७.५.२००७ |
| १० | चांदवड | २५ | २१.५.२००७ |
| ११ | पेठ | १० | ५.६.२००७ |
| १२ | सुरगाणा | १५ | २१.५.२००७ |
| १३ | त्र्यंबक | १५ | ४.६.२००७ |
| १४ | देवळा | १५ | १०.५.२००७ |
| १५ | दिंडोरी | ३० | १५.६.२००७ |
| | **एकुण---** | **३७०** | |

**खर्चाचा तपशिल-**

| अ.नं. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | १६६/२१.८.२००७ | ४,९८,७६० | साईज ६ X ६ मीटर (जॉईट हुक) प्रति नग रुपये-२,६९६/- प्रमाणे |

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१) पंचायत समिती इगतपूरी, सिन्नर, व देवळा गटांकडील मागणी प्रस्तावावर कृषी अधिकारी यांची सही आहे मात्र गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक १०८९/प्र.क्र./५५/३४ दिनांक ५.१०.१९८९ नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला किंवा कसे याची पडताळणी करता आलेली नाही.

३) उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यांत आलेले नाही.

४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास १०९८/ प्र.क्र.७३/३४ दि. २०.१०.१९९९ नुसार लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता असलेबाबतचे कागदपत्र लेखा परीक्षणांस उपलब्ध झालेले नाहीत.

५) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २.१.१९९२ मधील परि. ८.३ नुसार मागणीप्रमाणे साहित्य सुस्थितीत व योग्य गुणवत्तेने प्राप्त झाले बाबतचे प्रमाणपत्र घेण्यांत आलेले नाही.

६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड.पी.अे./ २०००/प्र.क्र./४०२३/३३ दिनांक १२.१.२००१ नुसार प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनेची माहिती स्थायी समिती / विषय समितीचे बैठकित अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक तिमाही बैठकित केलेल्या कार्यवाहीचा आढावा दर्शविणारा अहवाल समितीच्या बैठकीत सादर करणे आवश्यक आहे. मात्र त्या प्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

वरील आक्षेपांची पूर्तता होईपावेतो रक्कम रुपये-४,९८,७६०/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
जिल्हा परिषद सेस
आक्षेपाधीन रक्कम रुपये-४,९८,७६०/-

(विवरणत्र क्रमांक ८ चा अ.क्र. २ पहा.)

---

## स्थानिक क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ३ (अ) :- योजनांची प्रसिध्दी, प्रदर्शन, पीक स्पर्धा, प्रदर्शने, साहित्य खरेदी / पुस्तिका / माहितीपत्रके छपाई बाबत.**

**प्रशासकीय मान्यता-** अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक कडील जा.क्र.शेतकी/ब-३/३८२/०७ दिनांक ३०.५.२००७

**तांत्रिक मान्यता-** कृषी विकास अधिकारी कडील जा.क्र.शेतकी/ब-३/सेस/१९३/०७ दिनांक ३१.५.२००७

**खर्चाचा तपशिल-**

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १३२ | १७.९.२००७ | १०,००० |
| २ | १३७ | १९.७.२००७ | ९०,००० |

**आदेश क्रमांक-** कृषी विभाग, जिल्हा परिषद नाशिक जा.क्र.शेतकी/ब-३/४४०/०७ दिनांक २६.६.२००७ अन्वये ९०,०००/- अनुदान वितरीत
अधिक तपशिल खालीलप्रमाणे -

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियमानुसार ‘शेतीची अभिवृध्दी व सुधारणासाठी' योजना राबविली आहे. सदर योजना ही कलम १०० च्या (कृषी-२) नियमाखाली राबविणे आवश्यक आहे. चुकीच्या अनुसूची खाली राबविली आहे.

२)	योजनेचा उद्देष कृषी योजना व तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी घडी पत्रिका, महिती पुस्तिका, छपाई तक्ते तयार करणे / खरेदी करणे असा नमुद केला आहे तसेच टिपणी मध्येही जिवाणू खत, घडीपत्रिका, बीज प्रकिया माहिती, घडी पत्रिकासाठी योजना राबविणे.

३)	योजना राबविण्याची पध्दत ही (अ) पंचायत समिती स्तरावरुन घडीपत्रिका माहिती पुस्तिका, छापील तक्ते, इत्यादी वाटप लाभार्थीचे मागणी प्रमाणे करणेत येईल. (ब) शासकीय मुद्रणालय, जिल्हा परिषद मुद्रणालय, कृषी विद्यापीठे शासनाने प्राधिकृत केलेल्या संस्था, स्थानिक मान्यता प्राप्त संस्था यापैकी अथवा वित्तीय नियमांचे पालन करुन खरेदी करण्यांत येईल.

४)	सदर योजनेतंर्गत प्रत्येक गटास रुपये-६,०००/- प्रमाणे १५ गटांस रुपये-९०,०००/- इतके वित्त प्रेषणाद्वारे गटास वितरीत करणे व उर्वरित १०,०००/- जिल्हा परिषद स्तरावर खर्च करणेत आलेले आहेत.

५)	कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र.कृषी/ब-३/सेस/ ५१५/०७ दिनांक २७.७.२००७ अन्वये योजनांचा प्रसार व प्रसिध्दी तालुकास्तरावर दिलेल्या वित्त प्रेषणातून १० X १५ फुटांचे २ होर्डीग पंचायत समिती स्तरावर दिलेल्या आवारात लावण्यांत यावे असे आदेश देण्यात आले आहेत.

६)	१५ गटांसाठी खालील प्रमाणे दरपत्रके मागविणेत आली.

| **अ.क्र.** | **पुरवठादार** | **दर रुपये** | **होर्डींग** |
|---|---|---|---|
| १ | बिपीन आर्ट | ४० | प्रती स्क्वेअर फुट |
| २ | साई आर्ट | ४८ | प्रती स्क्वेअर फुट |
| ३ | नवरंग आर्ट डेकोरेटेड | ५२ | प्रती स्क्वेअर फुट |

उपरोक्त बिपीन आर्टचे दर कमी असल्याने मंजूर करुन पुरवठा आदेश त्या-त्या गटांनी दिलेले आहे.

उपरोक्त योजना ही घडीपत्रिका, माहितीपत्रिका, छापील तक्ते तयार करणे यावर खर्च करणे अपेक्षित असतांना प्रत्यक्षांत फक्त माहितीचे होर्डिग बनविण्यांत आलेले आहे. त्यामुळे योजनेचा मुळ उद्येष पूर्णतः डावलला आहे. याबाबत उदिदष्टपूर्ती झाल्याबाबत प्रस्तावित करुन जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे क्षमापन घ्यावे. अन्यथा जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसुल करुन जिल्हा परिषद निधीत भरणा केलेचे अनुपालन दाखवावे.

लेखाशिर्ष
जिल्हा परिषद सेस
वसुलपात्र रक्कम रुपये-९०,०००/-
आक्षेपाधीन रक्कम रुपये-१०,०००/-

(विवरणत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ३ पहा.)

## परिच्छेद क्रमांक ३(ब):- शेतक-यांचे परिसंवाद व प्रशिक्षण वर्ग व सत्कार पारितोषिके देणे सन २००७-०८

**तरतुद-** रुपये-१०,००,०००/-

**प्रशासकीय मान्यता-** अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक कडील जा.क्र.शेतकी/ब-३/सेस/३७१/०७ दिनांक २५.५.२००७

**तांत्रिक मान्यता-** अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक कडील जा.क्र.शेतकी/ब-३/सेस/३९४/०७ दिनांक १.६.२००७

**गटांना अनुदान वाटप आदेश-**

१) कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र. शेतकी/ब-३/४४२/०७ दिनांक २७.६.२००७ अन्वये १५ गटांना प्रत्येकी २० शेतकी प्रशिक्षणांसाठी रुपये-६०,०००/- प्रमाणे रुपये-९,००,००० वितरीत.(५० लाभार्थी ६० रुपये प्रमाणे ३,००० प्रति प्रशिक्षण)

२) कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र. शेतकी/ब-३/६७६/०७ दिनांक २४.९.२००७ अन्वये १५ गटांना प्रत्येकी २० शेतकी प्रशिक्षणांसाठी रुपये-६०,०००/- प्रमाणे रुपये-९०,०००/- वितरीत

३) कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र.शेतकी/ब-३/५५४/०७ दिनांक ३१.७.२००७ नुसार रुपये-९,६८२/- शेतकी दिनांक १ जूलै २००७ रोजीचा खर्च.

**खर्चाचा तपशिल ः**

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १३४ | १९.७.२००७ | ९,००,००० |
| २ | १८२ | १८.१०.२००७ | ९०,००० |
| ३ | १२४ | २१.८.२००७ | ९,६८२ |
| | | **एकूण** | **९,९९,६८२** |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१) उपरोक्त योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे नियमावलीतील पहिली सुची कलम १०० मधील कृषी २ पीक स्पर्धा या योजनेखाली राबविण्यांत आलेली आहे. उपरोक्त केलेला खर्च सदर कलमाखाली येत नसल्याने योजना चुकीची राबविली आहे, कारण वरील आक्षेप अ प्रमाणे प्रसिध्दी, प्रदर्शने, पीक स्पर्धा, साहित्य खरेदी, माहिती पुस्तिका छपाई ही स्वतंत्र रुपये-१,००,०००/- लाखाची योजना राबविण्यांत आलेली आहे.

२) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. गळित/०७-०८/मार्ग सूचना/ वि.प्र./ १४६/२००७ दिनांक २३.४.२००७ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार 'शेतकरी प्रशिक्षण ' हा विषय पूर्णतः जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे अधिनस्त ठेवण्यांत आला आहे. तशी सक्षम मनुष्यबळ यंत्रणाही कृषी विभागाकडे आहे. जिल्हा परिषदांच्या कृषी विकास अधिका-यांकडे हा विषय सोपविलेला नसतांनाही व ज्या पत्राचा आधार घेतला तेही जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना दिलेल्या मार्गदर्शक सूचना असतांना त्यावर योजना राबविणे पूर्णतः नियमबाहय आहे.

३)  प्रशिक्षणाचे विषय, तालुकानिहाय वेळापत्रक, कालावधी, प्रशिक्षणार्थीची संख्या, प्रशिक्षण वर्ग संख्या, विषय तज्ञ तसेच अनुभवी व प्रगतीशील शेतकरी यांचे सोबत चर्चा करुन विषयाची व्याप्ती, प्रशिक्षणाचे आयोजन, प्रशिक्षणार्थीच्या प्रतिक्रिया, योजनानिहाय प्रस्तावित प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी बाबींची कोणतीही कार्यवाही केलेली नाही. मुळातच योजना चुकीची राबविल्याने जिल्हा परिषदेवर नाहक रक्कम रुपये-१०,००,०००/- चा भूर्दंड सोसावा लागला.

४)  कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र.शेतकी/ब-३/ सेस/५६८/०७ दिनांक १७.८.२००७ अन्वये गटास दिलेले अनुदान अद्याप पर्यत खर्च न झाल्याने व ते अनुदान ऊस विकास योजनेकडे वर्ग करावयाचे असल्याने खर्च न करता समायोजन करावे असे १५ गटांना कळविण्यांत आले. तदनंतर कृषी विकास अधिकारी कडील जा.क्र. शेतकी/ ब-३/ सेस/६७३/०७ दिनांक १९.९.२००७ अन्वये सदर अनुदान हे वर्ग करता येत नसल्याने गटांनी उपरोक्त योजनांवर खर्च करावा असे आदेशित केले आहे. तसेच कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील पत्र क्रमांक ८४६/०७ दिनांक १२.७.२००७, ४१ दिनांक २४.१.२००८ अन्वये वितरीत केलेल्या अनुदान खर्चाबाबत खरीप व रब्बी हंगाम संपला तरी आपण प्रशिक्षणाबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही; आपणावर कार्यवाही का करणेत येऊ नये अशा आशयाची नोटीस संबधित कृषी अधिका-यांना पाठविली आहे.

उपरोक्त आक्षेपांवरुन सदर योजना पूर्णतः नियमबाहय अनावश्यक असतांनाही कुठल्याही नियोजनाशिवाय राबविल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे या योजनेवरील खर्चाची रक्कम रुपये- ९,९९,६८२/- वसुल करुन अनुपालन दाखवावे.

लेखाशिर्ष
जिल्हा परिषद सेस
वसुलपात्र रक्कम रुपये-९,९९,६८२/-

(विवरणत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ४ पहा.)

---

## स्थानिक क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील अनियमितता

## निरंक

---

## स्थानिक क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड ) खालील अनियमितता

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- जिल्हा परिषद सेस अंतर्गत शेतक-यांना ५० टक्के अनुदानावर सुधारीत भात बियाणे खरीप हंगामासाठी पुरविणेबाबत..**

कृषी विभाग, जिल्हा परिषद नाशिक ने सन २००७-०८ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत ५० टक्के अनुदानांवर शेतक-यांना खरीप हंगामासाठी सुधारीत भात बियाणे पुरवठा करण्यांसाठी रक्कम रुपये-४,८६,०००/- ची तरतुद करण्यांत आलेली असुन खर्च रुपये-४,८५,९२५८/- करण्यांत आलेला आहे.

या बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**प्रशासकीय मंजूरी-** म.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्रमांक शेतकी/ब-३/सेस/३६१/२००७ दिनांक १९.५.२००७

**तांत्रिक मंजूरी-** म.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्रमांक शेतकी/ब-३/सेस/ /२००७ दिनांक ३०.५.२००७

**पुरवठादार -** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्यादित सातपूर, जिल्हा नाशिक.

**पुरवठा आदेश क्रमांक-** शेतकी/ब-३/जि.प.सेस/३९७/०७ दिनांक १.६.२००७

**खर्चाचा तपशिल -**

| अ. नं. | प्रमाणक क्रमांक / दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २/ ९.८.२००७ | ४,८५,९२५ | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्यादित सातपूर यांचेकडून रुपये-१,९००/- प्रति क्विटंल प्रमाणे ५११.५० क्विटंल खरेदी |

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती इगतपूरी, पेठ, सिन्नर इत्यादी गटांकडील मागणी प्रस्तावावर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

२) पंचायत समिती दिंडोरी गटातील खालील लाभार्थ्यांचे अर्ज पडताळणी साठी उपलब्ध झालेले नाहीत.

| अ.नं. | लाभार्थ्यांचे नांव | गावांचे नांव |
|---|---|---|
| १ | श्री.जयराम नाना पगारे | गोळशी |
| २ | श्री.विष्णू हनुमंत पगारे | गोळशी |
| ३ | श्री.संतोष भिवा निकम | इंदोरे |
| ४ | श्री.देवराम उमाजी पगारे | जालखेड |
| ५ | श्री.रमेश पोपट लोखंडे | इंदोरे |
| ६ | श्री.प्रकाश काशिनाथ अहिरे | वारे |
| ७ | श्री.अशोक विठठल मोरे | जालखेड |
| ८ | श्री.प्रविण रावजी ठेपणे | ठेपणपाडा |
| ९ | श्री.दौलत नथू लाहांगे | गोळशी |

वरील लाभार्थ्यांचे अर्ज लेखा परीक्षणांस पडताळणीस उपलब्ध करणेत आलेले नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक २ दिनांक २६.२.२००९ देवूनही लाभार्थ्यांचे अर्ज पडताळणीस उपलब्ध झालेले नाहीत. तरी लाभार्थ्यांचे पात्रता दर्शक प्रस्ताव व विनीयोग दर्शवावा अन्यथा दिलेल्या लाभाची रक्कम रुपये-५,१३०/- वसुल करुन योग्य त्या शिर्षाखाली जमा करुन अनुपालन दर्शवावे.

३) श्री. खंडु तुळशिराम भोये, रा.नळवाडपाडा, तालुका दिंडोरी यांच्या अर्जाची पडताळणी केली असता ७/१२ उता-यांवर भात क्षेत्र असल्याची नोंद नाही. सदर लाभार्थीने भातीची लागवड केली नसतांना त्यांना अयोग्य लाभ दिलेला आहे. सदरी रक्कम रुपये-५७०/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

४) सदरच्या योजनेची उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यांत आलेली नाहीत.

वरील प्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपावेतो रक्कम रुपये-४,८५,९२५/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
जिल्हा परिषद सेस
आक्षेपाधीन रक्कम रुपये-४,८५,९२५/-

(विवरणत्र क्रमांक ८ चा अ.क्र. ५ पहा.)

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- अर्थसंकल्पिय तरतुदीपेक्षा कमी / जास्त खर्च रक्कमांबाबत.**

कृषी विभाग, जिल्हा परिषद, नाशिकचे सन २००७ - २००८ च्या लेख्यांची तपासणी केली असता शासनाकडून मिळालेले अनुदान व प्रत्यक्ष खर्च रक्कमा, कमी / जास्त खर्च, आदि विषयक तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | बाबवार तपशिल | सुधारीत अंतिम अनुदान | प्रत्यक्ष केलेला खर्च | कमी खर्च | जास्त खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **अभिकरण योजना** गळीत धान्य विकास कार्यक्रम | - | २३,७४,००० | २३,७३,६९३ | ३०७ | ० |
| २ | कडधान्य विकास कार्यक्रम | - | २,७१,१५१ | २,७१,१५१ | ० | ० |
| ३ | ऊस विकास कार्यक्रम | - | ५,९०,७२० | ५,९०,२२० | ५०० | ० |
| ४ | मका विकास कार्यक्रम | - | ५६,००० | ५६,००० | ० | ० |
| ५ | तृणधान्य विकास कार्यक्रम | - | ४,००,००० | ४,००,००० | ० | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | विशेष घटक योजना | - | २,१७,८६,००० | २,१७,७८,५०३ | ७,४९७ | ० |
| ७ | ओ.टी.एस.पी. योजना | - | ४५,५०,००० | ४४,२९,९६२ | १,२०,०३८ | ० |
| ८ | टि.एस.पी.योजना | - | १,५०,००,००० | १,४९,९९,३८३ | ६१७ | ० |
| ९ | २४०१-०१६३ पीक संवर्धन जि.प.आस्थापना | वेतन व भत्ते | १,००,००,००० | ७६,९३,६६९ | २३,०६,३३१ | ० |
| १० | २४०१-०१६३ पीक संवर्धन जि.प.आस्थापना | प्रवासभत्ते | ८,५०,००० | ८,३७,००७ | १२,९९३ | ० |
| ११ | २४०१-०१६३ पीक संवर्धन जि.प.आस्थापना | कार्यालयीन खर्च | ५५,००० | ६३,११२ | ० | ८,११२ |
| १२ | २४०१-०७५३ २४०१-पीक स्पर्धा | पीक स्पर्धा | ५००,००० | ४,४२,५०० | ५७,५०० | ० |
| १३ | २४०१-२४४२ | वेतन व भत्ते | ३१,२७,४०० | २,७,८८,४७३ | ३,३८,९२७ | ० |
| १४ | २४०१-२४४२ | प्रवास भत्ते | ३,२५,००० | ३,५३,६२६ | ० | २८,६२६ |
| १५ | २४०१-२४४२ | कार्यालयीन खर्च | ४,००० | ४,००० | ० | ० |
| | | **एकुण---** | **५,९८,८९,२७१** | **५,७०,८१,२९९** | **२८,४४,७१०** | **३६,७३८** |

सदर कमी / जास्त खर्चावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १४० प्रमाणे अर्थसंकल्पिय तरतुदीपेक्षा जादा खर्च करणे अनियमित आहे. सदर जादा खर्चास शासनाचे क्षमापन प्राप्त करुन अनुपालन दाखवावे.

२) शासकीय अनुदानाची अखर्चित रक्कम रुपये-२८,४४,७१०/- शासनाकडे भरणा करुन अनुपालन दाखवावे.

३) सन २००७-०८ साठी शासकीय अनुदानाच्या जमा खर्चाचे निर्धारण अप्राप्त आहे. अनुदान निर्धारणाच्या अधिन राहून कमी / जास्त खर्चाबाबत आक्षेपांत सूचित केल्यानुसार कार्यवाही करावी.

प्राप्त अनुदान व त्या अनुषंगाने केलेला खर्च योग्य असल्याबाबत पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- तृणधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत उत्कृष्ट ग्रामपंचायत पारितोषिक देण्यासाठी अनुदान वाटपाबाबत..**

**तरतुद-** रुपये-३,००,०००/- (केंद्रीय अनुदान)
रुपये-१,००,०००/- (राज्य अनुदान)

**मार्गदर्शक सुचना-** मा.कृषी संचालक (वि.प्र.), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र.तृधावि कार्यक्रम/ वि.प्र.१/२२०७/७५/०७ दिनांक ११.६.२००७

**प्रशासकीय मान्यता-** केंद्र शासन कृषी मंत्रालय, कृषी व सहकार विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ६-६/०७ एम.एम.-१ दिनांक १ मे २००७ ( खरीप हंगाम- भात, ज्वारी, बाजरी, नागली व रब्बी हंगाम- ज्वारी, गहू).

योजेनेतील महत्वाच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

१) एका तालुक्यांतील एकुण गावांपैकी कमीत कमी ५ ग्रामपंचायतींनी स्पर्धेत भाग घेणे बंधनकारक राहील. ज्या ग्रामपंचायतीची त्या तालुक्यांत सर्वात अधिक उत्पादकता राहील त्या ग्रामपंचायतीस त्या वर्षासाठी रुपये-५०,०००/- चे रोख रक्कमेचे पारितोषिक देणेत येईल.

२) क्षेत्र - ज्या पिकाची निवड करावयाची आहे त्या पिकाचे त्या गावातील किमान ४० हेक्टर (१०० एकर) क्षेत्र असणे आवश्यक आहे. स्पर्धेत एकुण ८ तालुक्यांनी भाग घेतला त्यामध्ये १. दिंडोरी, २. सिन्नर, ३. देवळा, ४. कळवण, ५. नांदगांव, ६. पेठ, ७. इगतपूरी ८. निफाड यांचा समावेश आहे.

**अ) सिन्नर**

| अ.क्र. | गावाचे नांव | पेरणी क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| १ | चिंचोळी | १५.४८ |
| २ | नांदूर शिंगोटे | १४.२२ |
| ३ | पांगरी बु.// | ८.०० |
| ४ | देवपूर | यादी उपलब्ध नाही. |
| ५ | मुसळगांव | ६४.७० |

वरील मार्गदर्शक सुचनांनुसार कमीत - कमी ४० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. परंतू नस्ती सोबत जोडलेल्या प्रस्ताव यादी प्रमाणे उपरोक्त गावाचे क्षेत्र कमी आहे. फक्त मुसळगांव ग्रामपंचायतीचे क्षेत्र जास्त आहे. परंतू बक्षीस पांगरी बु.// ग्रामपंचायतीस दिल्याने रुपये-५०,०००/- चुकीचे प्रदान झाले आहे. मुळात उपरोक्त ४ ग्रामपंचायत क्षेत्र कमी असल्याने त्यांचा स्पर्धेतील सहभाग नियमबाहय आहे. त्यामुळे नियमबाहय प्रदान बक्षिसाची रक्कम रुपये-५०,०००/- जबाबदारी निश्चित करुन वसुल करावी.

**ब) इगतपूरी**

| अ.क्र. | गावाचे नांव |
|---|---|
| १ | उभारे |
| २ | नांदगांव (व) |
| ३ | निनावी |
| ४ | मयांबे |
| ५ | अडसरे बु. |

उपरोक्त तालुक्यांतील प्रस्ताव अपूर्ण भरलेले आहे. त्यामुळे गावांचे क्षेत्र ४० हेक्टर पेक्षा जास्त असलेबाबत खात्री करता येत नाही. तरी पूर्तता करुन अनुपालन दाखवावे.

**क) दिंडोरी**

| अ.क्र. | गावाचे नांव | ग्रामपंचायत अर्जाप्रमाणे क्षेत्र (हेक्टर) | ग.वि.अ.यांच्या पत्रान्वये क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | पिंपळणारे | २३० | २७.१४ |
| २ | रासेगांव | १९० | २०.३० |
| ३ | तीसगांव | ६० | २५.४२ |
| ४ | मडकीजांब | ९० | २०.२० |
| ५ | जांबुटके | ७९ | २०.२० |

उपरोक्त ५ ग्रामपंचायतीच्या अर्जानुसार क्षेत्र ४० हेक्टरपेक्षा जास्त दिसते परंतू गटविकास अधिकारी यांच्या पत्रान्व्ये ते कमी दिसते. गट विकास अधिका-यांनी नमुद केलेली तपशिल स्पर्धक ग्रामपंचायतीपेक्षा निश्चितच ग्राहय असल्यामुळे नियमान्वये कुठल्याही स्पर्धक ग्रामपंचायतीचे क्षेत्र किमान ४० हेक्टर नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे नियमबाहय स्पर्धेअंती प्रदान बक्षिसांची रक्कम रुपये ५०,०००/- जबाबदारी निश्चित करुन वसुल करावी.

**ड) पेठ**

| अ.क्र. | गावाचे नांव | पेरणी क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|
| १ | कोहोर | ५८.५९ |
| २ | करंजाळी | -- |
| ३ | घनशेत | २५.७८ |
| ४ | जोगमोडी | ३१.९६ |
| ५ | उंबरपाडा | ४०.२० |
| ६ | कुंभारबारी | ५६.२० |

उपरोक्त ६ ग्रामपंचायतींचे अर्जाचे अवलोकन केले असता २ ग्रामपंचायतीचे गव्हाखालील क्षेत्र हे ४० हेक्टर पेक्षा कमी आहे. व १ प्रस्ताव अपूर्ण आहे. असे असतांना तो गट भाग घेण्यांस पात्र नसतांना व मुदत दिनांक ३१.१.२००८ असतांना मार्च मध्ये अर्ज देऊन योजना राबविली आहे. घनशेत ग्रामपंचायतीचे गव्हाखालील क्षेत्र फक्त २५.७८ असतांना चुकीच्या पध्दतीने बक्षीस दिल्याने योजना राबवण्याचा हेतू सफल झाला नाही. रक्कम रुपये-५०,०००/- वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

७) नांदगांव तालुक्यानेही योजना मार्च मध्येच राबविल्याने योजनेचा हेतू सफल झाला नाही. याबाबत योजना सफल झाले बाबत सक्षम अधिका-याने प्रमाणीत करावे.

उपरोक्त बाबीची पूर्तता करणेत यावी. रक्कम रुपये १,५०,०००/- शासकीय अनुदानासाठी अंतिम अमान्य व तो होईपर्यत खर्चाची रक्कम रुपये २,५०,०००/- तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
मागणी क्रमांक डी-१
२४०१-पीक संवर्धन
१०२ अन्न द्रव्य पीके
(००) (११) केंद्र पुरस्कृत योजना
तृणधान्य व उस विकास या करिता प्रात्यक्षिक व
शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम. (२४०१-३०९१)
अंतिम अमान्य रक्कम रुपये-१,५०,०००/-
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये २,५०,०००/-

(विवरणपत्र क्रमांक ४ (अ) चा अ.क्र. १ पहा.)
(विवरणपत्र क्रमांक ४ (ब) चा अ.क्र. १ पहा.)

**परिच्छेद क्रमांक ७ :- केंद्र / राज्य (७५:२५) पुरस्कृत गळीत धान्य विकास कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानांवर सुधारीत औजारे पुरविणेबाबत..**

कृषी विभाग, जिल्हा परिषद, नाशिकचे सन २००७-०८ मध्ये केंद्र / राज्य पुरस्कृत गळीत धान्य विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर सुधारीत औजारे पुरविण्यासाठी रक्कम रुपये-१८,९३,४७५/- खर्च नोंदविला आहे. कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक गळीत-२००७/०८ मार्ग.सुचना/ वि.प्र.३/ १४६/२००७ दिनांक २३.४.२००७ व महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक आयएसओपी-१६०७/ सी.आर.११५/ ४ अे दिनांक १३.६.२००७ नुसार योजना राबविणेबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सदर योजनेचे मार्गदर्शक सुचनेनुसार अनुसूचीत जातीसाठी १६ टक्के , अनुसूचीत जमातीसाठी ८ टक्के व महिलांसाठी २० टक्के लाभ देण्यांत यावा व त्याबाबत स्वतंत्र नोंदवहीत नोंदी ठेवणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवून आवश्यक नोंदी घेऊन लेखा परीक्षणांस दाखविण्यांत याव्यांत.

२) मार्गदर्शक सुचनेनुसार सन २००६-०७ व २००७-०८ मध्ये वैयक्तिक शेतक-यांना लाभ द्यावयाच्या लाभार्थ्यांची यादी जिल्हा परिषद, पंचायत समिती, तालुका उपविभागीय अधिकारी कार्यालय (महसुल व कृषी) व जिल्हाधिकारी कार्यालय व प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयात लावण्यांत यावी व इंटरनेटवर देखील देण्यांत यावी असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यांस विविध कार्यालयांमार्फत एकाच प्रकारचे लाभ प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत मा.कृषी आयुक्त, पूणे यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दाखवावे.

३) योजनेचे सनियंत्रणाकरिता खालील प्रमाणे स्थळ तपासणी करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | विभागीय कृषी सह-संचालक | २ टक्के |
| २. | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | ३ टक्के |
| ३. | कृषी विकास अधिकारी | ५ टक्के |
| ४. | उप-विभागीय कृषी अधिकारी | १० टक्के |
| ५. | तालुका कृषी अधिकारी | २० टक्के |
| ६. | मंडळ कृषी अधिकारी / कृ. अ. जि.प./पं.स. | ५० टक्के |
| ७. | कृषी पर्यवेक्षक/ कृषी सहाय्यक /कृषी विस्तार अधिकारी | १०० टक्के |

वरील प्रमाणे तपासणी केल्याबाबतची कागदपत्रे / नोंदी लेखा परीक्षणांस उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे शासनाच्या योजनांवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवण्यांत येत नाही हे स्पष्ट होते. शासकीय योजनांचा योग्य लाभार्थ्यांस लाभ मिळाला आहे किंवा नाही याबाबत पडताळणी करता आलेली नाही. याबाबत मा. कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दाखवावे.

४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/१०८९/८४६/२६६/३४ दिनांक २९.७.१९८९ नुसार सुधारीत शेती औजारांचा शेतक-यांना लाभ दिल्यानंतर लाभार्थ्याचे उत्पन्नात किती वाढ झाली. योजनेची फल निष्पती / प्रगती अहवाल इत्यादी संबधित अहवाल पडताळणीस उपलब्ध केलेले नाहीत. त्यामुळे योजनेचा उद्येष कितपत सफल
झाला याची पडताळणी करता आली नाही. तरी फलनिष्पतीबाबत योग्य त्या कागदपत्रांसह पूर्तता सादर करण्यांत यावी.

५) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक १०८९/प्र.क्र.५५/३४ दिनांक ५.१०.१९८९ नुसार विहीत केलेली नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही. त्यामुळे सदर योजनेचा लाभ एकाच शेतक-यांस दुबार झालेला आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

६) श्रीमती. जयश्री अ. लोहारकर, राहणार- विंचूर, तालुका- निफाड यांचा मागणी अर्ज पडताळणीस उपलब्ध झालेला नाही.

७) दिंडोरी गटातील खालील लाभार्थ्यांचे अर्ज व संबधित कागदपत्रे पडताळणीस उपलब्ध झालेले नाहीत.

| **अ.क्र.** | **लाभार्थ्याचे नांव** | **गावाचे नांव** |
|---|---|---|
| १ | श्रीमती. अंजनाबाई सखाराम खांदवे | पिंपळणारे |
| २ | श्री. लक्ष्मण राम वायखांडे | मानोरी |
| ३ | श्री. रघुनाथ तुळशिराम गांगोडे | तळयाचा पाडा |
| ४ | श्री. पुंडलीक सोमा गांगोडे | चंडीकापूर |
| ५ | श्री. काशिनाथ बुधा गावित | अहिवंतवाडी |
| ६ | श्री. पुंडलिक देवराम धुळे | देवधर |
| ७ | श्री. पार्वताबाई विठ्ठल मोंढे | चंडीकापूर |

८) इगतपूरी गटाकडील मागणी प्रस्ताव पडताळणीस उपलब्ध केलेला नाही.

९) शासन निर्णय दिनांक १३.६.२००७ मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक ५ नुसार सदरच्या योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून (Third party Evaluation) करुन घ्यावे असे आदेशित केलेले आहे. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखविण्यांत यावे. तोपावेतो खर्च रक्कम रुपये-१८,९३,४७५/- तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
११, कृषी अभिकरण योजना
गळीत विकास कार्यक्रम
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-१८,९३,४७५/-

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. २ पहा.)

## परिच्छेद क्रमांक ८ :- केंद्र पुरस्कृत ऊस विकास कार्यक्रम अंतर्गत २५ टक्के अनुदानावर सुधारीत कृषी औजारे खरेदीतील अनियमितताबाबत.

मा. कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्रमांक नगदी पीके/उवियो/मासु/०७-०८/१७५/विप्र-४/०७ दिनांक २३.४.२००७ अन्वये ऊस विकास कार्यक्रमांतर्गत शेतक-यांना २५ टक्के अनुदानावर सुधारीत औजारे पुरविणे बाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्रमांक शेतकी /पीसं /पी-३/२४८ /२००७ दिनांक ३०.६.२००७ अन्वये एमएसएसआयडीसी ला पुरवठा आदेश देवून ३९१ ऊस बांधणी यंत्र रक्कम रुपये-२,३०,७८८/- ची खरेदी केलेली आहे. तसेच आदेश क्रमांक शेतकी / पीस/पी-३ /१९० /०८ दिनांक २७.३.२००८ अन्वये पुरवठा आदेश देवुन २२८ थ्री पिस्टन पंप एकुण रक्कम रुपये-३,४२,०००/- ची खरेदी केलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) ऊसावरील लोकरी मावा निर्मुलनासाठी औषधे खरेदीसाठी रक्कम रुपये-३,४२,५००/- अनुदान प्राप्त झालेले होते. परंतू मागणी नसल्यामुळे सुधारीत कृषी औजारे खरेदी करणे या बाबीवर अनुदान वळते करुन खर्च करण्यांस कृषी आयुक्तालय, पूणे यांनी त्यांचे पत्र क्रमांक नावि/ऊवियो/बाब बदल/२००७-०८/४६ /विप्र-४ /०८ दिनांक २.२.२००८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. मात्र बाब बदल प्रस्तावास कृषी आयुक्तालयाची मान्यता घेण्यापूर्वीच दिनांक ३०.६.२००७ रोजी पुरवठा आदेश देण्यांत आलेले आहेत. सदरची बाब नियमबाहय आहे. याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२) पंचायत समिती बागलाण, इगतपूरी, देवळा गटांकडील मागणी प्रस्तावावर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही. तसेच पंचायत समिती दिंडोरी कडील मागणी प्रस्ताव पडताळणीस उपलब्ध झाला नाही.

३) पंचायत समिती बागलाण कडील मागणी प्रस्तावाचा जावक दिनांक ७.७.२००७ रोजीचा असतांना मागणी प्रस्तावाचा आवक दिनांक १९.६.२००७ रोजीचा दर्शविला आहे. म्हणजेच दिनांक ३०.६.२००७ रोजी पुरवठा आदेश देण्यांसाठी तारखेत बदल केल्याचे दिसून येते. याबाबत संबधितांची जबाबदारी निश्चित करुन अनुपालन दर्शवावे.

४) पंचायत समिती येवला कडील २ थ्री पिस्टन पंप नादुरस्त असुन पुरवठादार महाराष्ट्र लघु उद्योग विकास केंद्राकडे दुरस्तीसाठी पाठविलेले आहेत. मात्र लेखा परीक्षण कालावधीपर्यत सदरचे थ्री पिस्टन पंप दुरस्ती करुन मिळालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांस सदरच्या लाभा पासून वंचित राहावे लागलेले आहे. याबाबत पुरवठादार दंडात्मक कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

५) पंचायत समिती मालेगांव कडील श्रीमती. यमुनाबाई बारीकराव पाटील ( रा.सोयगांव) यांचे ७/१२ उता-यांवर विहीरीची नोंद नाही

६) पंचायत समिती मालेगांव कडील लाभार्थी हिस्सा खालील प्रमाणे भरणा केलेला आहे.

| अ.क्र. | थ्री पिस्टन पंप लाभार्थी संख्या | रक्कम रुपये | भरणा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ३ | १७,८५० | १६.६.२००८ |
| २ | १ | ५,९५० | ३०.६.२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | १ | ५,९५० | २९.७.२००८ |
| ४ | १ | ५,९५० | २९.९.२००८ |
| **एकण-** | **६** | **३५,७००** | |

सदरची योजना सन २००७-०८ मध्ये राबवायची होती. मात्र पंचायत समिती मालेगांवने सदरची योजना सन २००८-०९ मध्ये राबविल्याचे दिसुन येते. सदरच्या अनियमिततेस शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दाखवावे.

८) सदरच्या योजनेचे लाभार्थी निवडतांना ग्रामसभेची मंजूरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

९) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.१०८९/प्र.क्र.५/३४दि.५.१०.१९८९ नुसार विहीत केलेली नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही. त्यामुळे सदर योजनेचा लाभ एकाच शेतक-यांस दुबार दिला किंवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखविण्यांत यावे. तोपर्यत खर्च रक्कम रुपये-९,३२,३४५/- तात्पुरता अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
११ कृषी, अभिकरण योजना
ऊस विकास कार्यक्रम
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-९,३२,३४५/-

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. ३ पहा.)

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- केंद्र पुरस्कृत कडधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर औजारे वाटप**

**तरतुद-** रुपये- ४३,०००/- पिक संरक्षण औजारे
रुपये- १,५०,०००/- एचडीपीई पाईप खर्च
१,९३,०००/-

**मार्गदर्शक सुचना-** मा.कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे कडील जा.क्र.कडधान्य/ ०७-०८ /मा.सु./वि.प्र.३ /१८३/ २००७ दिनांक २१.५.२००७

**प्रशासकीय मान्यता-** विभागीय कृषी सह-संचालक, नाशिक विभाग, नाशिक कडील जा.क्र. विना/ कृषी-१५/ कड/ ४८३३/०७ दिनांक २९.६.२०७ अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक आयएसओपी/ १६०७/प्र.क्र.१६५/ ४ अे

दिनांक १४ जून २००७

**पुरवठादार-** मा. विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. नाशिक.

**पुरवठादार आदेश -** अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र. शेतकी/पीसं/पी-३/२४७/०७ दिनांक ३०.६.२००७ (नॅपसॅक स्पेअर प्लॅस्टिक १६ लि. ) दर रु-८५०/- नग २९५ (अनु. रु-४२५ लाभार्थी हिस्सा रुपये-४२५/-)
(रॉकिंग स्पेअर पेओमेके) दर रुपये-१७५०/- नग ७५ ( अनु. रुपये-८०० लाभार्थी हिस्सा रुपये-९५०/-)

**<u>खर्चाचा तपशिल -</u>**

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १०० | २५.१०.२००७ | रुपये-४६,३४४ ( राज्य २५ टक्के ) |
| २ | ६७ | १०.१०.२००७ | रुपये-१,३९,०३१ ( केंद्र ७५ टक्के) |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१) सन २००७-०८ वैयक्तिक लाभ दिलेल्या लाभ धारकांची यादी पंचायत समिती कार्यालयांत लावण्यांत यावी. तसेच यादी इंटरनेटवर प्रसिध्दी करावी. कार्यक्रमाच्या २० टक्के महिलांना प्राधान्य देण्यांत यावे. लाभार्थी निवडतांना लहान व सीमांतक शेतकरी, अनुसुचित जाती व जमाती यांना प्राधान्य देण्यांत यावे. योजना राबवितांना परिणामकारक होण्याच्या दृष्टीने विकास कार्यक्रम राबविणेत आवश्यक असतांना वरील प्रमाणे अंमलबजावणी करण्यांत आलेली नाही, त्यामुळे योजनेच्या हेतू सफल झालेला नाही.

२) कडधान्याची योजना ७० टक्के खरीप हंगामातच राबविण्यांत यावी. असे असतांना १०० टक्के योजना रब्बी हंगामात राबविल्याने म्हणजेच औजारे पुरवठा जुन मध्ये होणे आवश्यक असतांना औजारे ऑगस्ट च्या शेवटी पुरवठा झाले व तदनंतर वाटप म्हणजेच योजना खरीप हंगामात राबविली नाही, त्यामुळे योजनेचा हेतू सफल झालेला नाही.

उपरोक्त बाबींची पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे तो पर्यत खर्चाची रक्कम रुपये-१,८५,३७५/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

लेखाशिर्ष
मागणी क्रमांक डी- २
२४०१-पीक संवर्धन, ११२ कडधान्य विकास
११२ (२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
राज्य व केंद्र पुरस्कृत
(००) (०१) (०२) कडधान्य पीक उत्पादन कार्यक्रम
(२४०१,२५८७,१७६९) ४३ अर्थसहाय्य
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-१,८५,३७५/-

(विवरणपत्र क्रमांक ४ (ब) चा अ.क्र. ४ पहा.)

**परिच्छेद क्रमांक १० :- अनावश्यक खरेदीमुळे विनावापर शिल्लक औजारांबाबत.**

मा. कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक नगदी पीके/ऊवियो/मा.सु./०७-०८/१७५/वि.प्र./४/०७ दिनांक २०.४.२००७ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कृषी विभाग, जिल्हा परिषद, नाशिक ने ऊस विकास कार्यक्रमांतर्गत शेतक-यांना २५ टक्के अनुदानावर सुधारीत कृषी औजारे पुरविण्यासाठी रक्कम रुपये-५,९०,३४५/- खर्च केलेले आहेत.

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सन २००६-०७ मधील खालील प्रमाणे शिल्लक असतांना सन २००७-०८ मध्ये पुन्हा तीच औजारे खरेदी केलेली आहेत. आणि सदरचे बहुतांशी साहित्य लेखा परीक्षण कालावधी पावेतो (दिनांक १०.२.२००९ पावेतो) शिल्लक आहे.

| अ. क्र. | गटाचे नांव | सन २००६-०७ | | सन २००७-०८ | | एकुण शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | खरेदी | शिल्लक | खरेदी | शिल्लक | |
| १ | सिन्नर | २० | ० | २६ | २६ | २६ |
| २ | येवला | ३० | ६ | २६ | २६ | ३२ |
| ३ | निफाड | ८० | ० | २७ | २३ | २३ |
| ४ | चांदवड | १० | ० | २६ | २६ | २६ |
| ५ | नांदगांव | १० | ० | २६ | २३ | २३ |
| ६ | मालेगांव | १५ | १३ | २६ | २५ | ३८ |
| ७ | बागलाण | ८० | ७६ | २६ | २६ | १०२ |
| ८ | कळवण | ८० | ६४ | २६ | २६ | ९० |
| ९ | दिंडोरी | १५ | १२ | २६ | २६ | ३८ |
| १० | नाशिक | ० | ० | २६ | २६ | २६ |
| ११ | इगतपूरी | ५ | २ | २६ | २५ | २७ |
| १२ | पेठ | ० | ० | २६ | २५ | २५ |
| १३ | सुरगाणा | ० | ० | २६ | १२ | १२ |
| १४ | देवळा | २० | १८ | २६ | २६ | ४४ |
| १५ | त्र्यंबक | २ | २ | २६ | २६ | २८ |
| | **एकुण---** | **३६७** | **१९३** | **३९१** | **३६७** | **५६०** |

सन २००६-०७ मध्ये खरेदी केलेली ऊस बांधणी यंत्र नग संख्या ३६७ पैकी १९३ म्हणजेच ५३ टक्के शिल्लक असतांना सन २००७-०८ मध्ये ३९१ ऊस बांधणी यंत्र खरेदी केलेले आहेत. त्यापैकी ३६७ (९४ टक्के) शिल्लक आहेत. आज अखेर पावतो एकूण ५६० ऊस बांधणी यंत्रे शिल्लक आहेत. म्हणजेच शेतक-यांची मागणी नसंताना केवळ अनुदान खर्च करण्याच्या उद्देषानेच सदरची अनावश्यक खरेदी करण्यांत आलेली आहे. यामध्ये प्रति ऊस बांधणी यंत्र किंमत रुपये-२,३६१/- प्रमाणे एकुण रककम रुपये-१३,२२,१६०/- अडकलेली आहे.

याबाबत सन २००६-०७ च्या लेखा परीक्षणांत आक्षेप क्रमांक १८ नोंदवुनही या बाबत हेतू परस्पर दूर्लक्ष केल्याचे दिसून येते. तरी याबाबत संबधितांची जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये-५,९०,३४५/- वसुल करुन शासन सदरी भरणा करण्यांत यावी व शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

वरील प्रमाणे आक्षेपांची पूर्तता होईपावेतो रक्कम रुपये-५,९०,३४५/- अंतिम करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
११ कृषी, अभिकरण योजना
ऊस विकास कार्यक्रम
अंतिम अमान्य रक्कम रुपये-५,९०३४५/-

(विवरणपत्र क्रमांक ४(अ) चा अ.क्र. २ पहा.)

---

## परिच्छेद क्रमांक ११ :- निलंबन लेख्यांतील असमायोजीत रक्कमांबाबत.

अर्धसमास पत्र क्रमांक ४ दिनांक २६.२.२००९ अन्वये निलंबन लेख्यांतील असमायोजीत रक्कमांबाबत माहितीची मागणी केली असता बायोगॅस योजनेतंर्गत संयत्राचे बांधकाम करण्यासाठी खात्यामार्फत विविध गटांना सिमेंटचा पुरवठा करण्यांत आलेला होता, त्याबाबत दिनांक ३१.३.२००८ अखेरचा उपलब्ध तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | गटाचे नांव | असमायोजीत रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | कळवण | १४,९८२ |
| २ | बागलाण | १,६३,१३० |
| ३ | चांदवड | १९,०७८ |
| ४ | येवला | ३७,९०१ |
| ५ | सिन्नर | १३,५९० |
| ६ | इगतपूरी | १६,६६० |
| ७ | सुरगाणा | ८,३८४ |
| | **एकुण---** | **२,७३,७२५** |

सदरच्या रक्कमा सन १९९६-९७ पासून खात्यांकडे प्रलंबित आहेत. याबाबत सन १९९६-९७ च्या लेखा परीक्षण अहवालांत क्रमांक ३९ नुसार आक्षेप नोंदवूनही वसुलीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

तरी शासकीय रक्कमांच्या वसुलीबाबत दूर्लक्ष करणा-या सबंधितावर प्रशासकीय कारवाई करुन रक्कम रुपये-२,७३,७२५/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
२४०१-बायोगॅस
अंतिम अमान्य रक्कम रुपये-२,७३,७२५/-

(विवरणपत्र क्रमांक ४ (अ) चा अ.क्र. ३ पहा)

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील अनियमितता.

**---निरंक---**

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड ) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- केंद्र पुरस्कृत गळीतधान्य / कडधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत शेतक-यांना ५० टक्के अनुदानावर जिप्सम वाटप करणे..**

**तरतुद -** गळीत धान्य रुपये- ३,२०,२५०/-
रुपये- ३७,५००/-
एकुण--३,५७,७५०/-

**मार्गदर्शक सुचना-** कृषी आयुक्तांकडील गळीत धान्य जा.क्र.गळीत/०७-०८/मार्ग सूचना/ वि.प्र. ३/ १४६/०७ दिनांक २३.४.२००७ व कडधान्य जा.क्र.कडधान्य/ ०७-०८ /मार्ग सुचना/वि.प्र.३ /१८३/ ०७ दिनांक ४.६.२००७

**प्रशासकीय मान्यता-** पत्र क्र. २-१/०७/पल्स/(टीएमओपी)/ दिनांक १४.५.२००७

**पुरवठादार आदेश -** अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र. शेतकी / पीसं/ पी-३/ जि.पुरवठा/३३४/ ०७ दिनांक २८.८.२००७ (गळीत धान्य -२११.५० मे.टन) दर रुपये-१,८००/- (५० टक्के अनुदान) रुपये-२८७.५० व १५१२.५०
(कडधान्य -२४.५० मे.टन) दर रुपये-१८०० (५० टक्के अनुदान रुपये- २८७.५० व १५१२.५०

| अ.क्र. | प्रमाणक क्र. / दि. | रक्कम | |
|---|---|---|---|
| १ | ३०/१७.१२.२००७ | ७९,९७४ | राज्य २५ टक्के गळीत धान्य |
| २ | ३१/१७.१२.२००७ | २,३९,९२० | केंद्र ७५ टक्के गळीत धान्य ..२११.५० मे.टन |
| ३ | २९/१७.१२.२००७ | ९,२९४ | राज्य २५ टक्के कडधान्य |
| ४ | ३२/१७.१२.२००७ | २७,७९२ | केंद्र ७५ टक्के कडधान्य .. २४.५० मे.टन |
| **एकुण-----** | | **३,५६,९८०** | |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

अ) प्रति हेक्टरी ४०० किलो जिप्समस देय.

ब) लाभार्थी अर्हतः तुर, मुग, उडीद, व इतर कडधान्य घेणारे शेतकीर तसेच गळीत मध्ये भुईमुग, सूर्यफुल, सोयाबीन पीके घेणारे शेतकरी.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) मालेगांव- जिप्समसाठी एकुण ५३ प्रस्ताव

| अ.क्र. | लाभार्थीचे नांव | क्षेत्र | पीक |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. शालिनीबाई रामभाऊ मोरे (साकुरी) | ०.२० आर | बाजरी |
| २ | श्रीमती. जानकाबाई मोहन मोहिते (मळगांव) | १.२१ आर | मका, कांदे |
| ३ | श्री. मोहनलाल कन्हैयालाल मोहिते (मळगांव) | ०.४९ आर कब्रस्तान ट्रस्ट | कपाशी, कांदे |
| ४ | श्री. महेश यशवंत अहिरराव | ०.३० आर | डाळींब |
| ५ | श्रीमती. सारजाबाई पांडूरंग खैरनार | ०.२२ आर | डाळींब |

उपरोक्त ५ प्रस्ताव तपासणी केली असता ७/१२ उता-यांवर कडधान्य किंवा गळीत धान्याची नोंद नाही. तसेच उपरोक्त प्रस्तावातील शेतक-यांची जमीन धारणा १ हेक्टर पेक्षा कमी असतांना पूर्ण लाभ दिलेला आहे. त्यामुळे योजनेचा हेतू सफल झालेला नाही.

२) पेठ गटांस एकुण १२ मेट्रिक टन जिप्सम पुरवठा करण्यांत आलेला आहे. परंतू प्रस्ताव लेखा परीक्षणांस उपलब्ध झाले नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक २ दिनांक २६.२.२००९ देवूनही प्रस्ताव पडताळणीस उपलब्ध झालेले नाहीत. प्रस्ताव उपलब्ध करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे. अन्यथा रक्कम वसुल करुन शासन सदरी भरणा करण्यांत यावी.

उपरोक्त बाबींची पूर्तता होईपर्यत रक्कम रुपये-३,५९,९५०/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
मागणी क्रमांक डी-२,२४०१- पीक संवर्धन केंद्र
व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत योजना
प्रकर्षित तेलबिया विकास कार्यक्रम, व कडधान्य
पीक उत्पादन कार्यक्रम
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-३,५९,९५०/-

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. ५ पहा.)

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- केंद्र पुरस्कृत गळीतधान्य / कडधान्य विकास कार्यक्रम अंतर्गत शेतक-यांना ५० टक्के अनुदानावर जैविक खते वाटपाबाबत.**

**तरतुद-** गळीत धान्य रुपये- १,०२,३००/-
रुपये- २५,०५०/-
एकुण - १,२७,३५०/-

**मार्गदर्शक सुचना-** कृषी आयुक्तांलय यांचेकडील जा.क्र.गळीत/०७-०८/मार्ग सूचना/ वि.प्र. ३/ १४६/०७ दिनांक २३.४.२००७ व जा.क्र.कडधान्य/ ०७-०८ /मार्ग सुचना/वि.प्र.३ /१८३/ ०७ दिनांक ४.६.२००७

**प्रशासकीय मान्यता-** पत्र क्रमांक २-१/२००७ /पल्सेस/टीएमओपी/ दिनांक १४.५.२००७

**पुरवठादाराचे नांव-** मा. संचालक, मे. अविष्कार बायोफार्म (प्रा) लि. प्रवरानगर.

**पुरवठा आदेश -** मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक कडील जा.क्र. शेतकी / पीसं/ पी-३/ २५० व २५१/०७ / ०७ दि. २८.६.२००७ तसेच ४२३ व ४२४ दि.२८.६.२००७

(गळीत धान्य - पी.एस.बी. पाकिटे (वजन ५०० ग्रॅम) किंमत रु. १२.५० (अनुदान रु. ६.२५) एकुण ११४५६+२१८४ कडधान्य मागणी २८०५+१२०२

**खर्चाचा तपशिल -**

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक / दिनांक | रक्कम | अनुदान | पीक |
|---|---|---|---|---|
| १ | १०/२६.१०.२००७ | १७,९०० | २५ टक्के राज्य | गळीत |
| २ | १०८/२६.१०.२००७ | ५३,७०० | ७५ टक्के केंद्र | गळीत |
| ३ | २४/१७.१२.२००७ | ३,४१२ | २५ टक्के राज्य | गळीत |
| ४ | २६/१७.१२.२००७ | १०,२३८ | ७५ टक्के केंद्र | गळीत |
| ५ | १०९/२६.१०.२००७ | १३,१४३ | ७५ टक्के केंद्र | कडधान्य |
| ६ | १०७/२६.१०.२००७ | ४,३४३ | २५ टक्के राज्य | कडधान्य |
| ७ | २५/१७.१२.२००७ | ५,६३४ | ७५ टक्के राज्य | कडधान्य |
| ८ | २७/१७.१२.२००७ | १,८७८ | २५ टक्के राज्य | कडधान्य |
| **एकुण-** | | **१,१०,२४८** | | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

जिवाणू संवर्धनाचे किंमतीचे ५० टक्के किंवा रुपये-५० प्रति हेक्टर अनुदान देय राहील. म्हणजेच एका शेतक-यांस ८ पाकिटे प्रमाणे वाटप करणे आवश्यक असतांना सर्वच्या सर्व १५ गटांनी ग्रामसेवकांना पुरवठा दर्शविला असून प्रत्यक्ष लाभार्थीच प्रस्ताव घेतलेले नसल्याने लाभार्थ्यीच्या ७/१२ उता-यांवर गळीत / कडधान्याची नोंद असलेबाबत खात्री करता आली नाही. वरील प्रमाणे पूर्तता होई पर्यत खर्चाची रक्कम रुपये-१,१०,२८८/- लेखा परीक्षणामध्ये शासकीय अनुदानासाठी तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

<u>लेखाशिर्ष</u>
मागणी क्रमांक डी-२
२४०१- पीक संवर्धन कडधान्य / गळीत धान्य
विकास पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
केंद्र व राज्य पुरस्कृत योजना
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-१,१०,२२८/-

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. ६ पहा.)

**परिच्छेद क्रमांक १४ :- बायोगॅस संयत्राबाबत..**

**(अ) पंचायत समिती, दिंडारी :-**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात बायोगॅस संयत्र बसविणे कामी खालीलप्रमाणे ९ लाभार्थीसाठी एकुण रक्कम रुपये-३७,७००/- इतका खर्च केलेला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ३०२ | ३१.३.२००८ | ३७,७०० | ९- लाभार्थी यांना अनुदान वाटप |
| | | एकुण---- | ३७,७०० | |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) बायोगॅस संयत्राची तपासणी नोंदवही अपूर्ण असल्यामुळे आतापर्यत किती बायोगॅस संयत्राचा लाभ दिलेला आहे, एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला किंवा कसे ? बायोगॅस संयत्र चालु स्थितीत आहेत किंवा कसे, याबाबत नोंदवही अपूर्ण असल्यामुळे खात्री करता आली नाही.

२) आजपोवेतो बायोगॅस संयत्र दुरस्तीवर कोणत्याही प्रकारची तरतुद व खर्च केल्याचे दिसून येत नाही.

३) लेखा परीक्षण कालावधी पावेतो कोणत्याही लाभार्थ्यास लाभ दिल्यापासून ते सयंत्र चालु किंवा बंद आहेत अशा स्वरुपांचे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी तसेच कृषी विस्तार अधिकारी यांनी नोंदवहीमध्ये नोंदविलेले नसल्याने सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांना किती झाला याची खात्री करता येत नाही.

४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीएस-१०९७/प्र.क्र.१६९६/३१ दिनांक ३०.८.१९९९ नुसार बंद पडलेल्या अथवा नादुरस्त झालेल्या बायोगॅस संयत्राच्या दुरस्तीसाठी जिल्हा परिषदांकडे शिल्लक असलेल्या टर्न की फी च्या रक्कमेतून खर्च करणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्र क्रमांक ३ दिनांक २६.२.२००९ नुसार प्राप्त झालेल्या माहितीनुसार ३१ मार्च २००८ अखेर जिल्हा परिषदकडे रुपये-५,८५,२१०/- टर्न की फी शिल्लक असतांना संयत्राच्या दुरस्तीवर खर्च झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत कृषी समितीचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

लेखाशिर्ष<br>
२४०१- बायोगॅस<br>
अपारंपारीक उर्जा राष्ट्रीय बायोगॅस.<br>
पं.स. दिंडोरी.

**(ब) पंचायत समिती, मालेगांव :-**

सन २००७-०८ या आर्थिक वर्षात बायोगॅस संयत्र बसविणे कामी खालीलप्रमाणे १७ लाभार्थ्यासाठी एकुण रक्कम रुपये-६४,१००/- इतका खर्च केलेला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | २.१.२००८ | ८,००० | २ लाभार्थी रुपये-४००० प्रती लाभार्थी |
| २ | १७१ | २७.२.२००८ | १२,००० | ३ लाभार्थी रुपये-४००० प्रती लाभार्थी |
| ३ | १६९ | ३१.३.२००८ | ४४,१०० | १२ लाभार्थी रुपये-४००० प्रती लाभार्थी |
| | **एकुण--** | | **६४,१००** | |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) बायोगॅस संयत्राची तपासणी नोंदवही अपूर्ण असल्यामुळे आतापर्यत किती बायोगॅस संयत्राचा लाभ दिलेला आहे, एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला किंवा कसे ? बायोगॅस संयत्र चालु स्थितीत आहेत किंवा कसे, याबाबत नोंदवही अपूर्ण असल्यामुळे खात्री करता आली नाही.

२) आजपोवेतो बायोगॅस संयत्र दुरस्तीवर कोणत्याही प्रकारची तरतुद व खर्च केल्याचे दिसून येत नाही.

३) लेखा परीक्षण कालावधी पावेतो कोणत्याही लाभार्थ्यास लाभ दिल्यापासून ते सयंत्र चालु किंवा बंद आहेत अशा स्वरुपांचे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी तसेच कृषी विस्तार अधिकारी यांनी नोंदवहीमध्ये नोंदविलेले नसल्याने सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांना किती झाला याची खात्री करता येत नाही.

४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीएस-१०९७/प्र.क्र.१६९६/३१ दिनांक ३०.८.१९९९ नुसार बंद पडलेल्या अथवा नादुरस्त झालेल्या बायोगॅस संयत्राच्या दुरस्तीसाठी जिल्हा परिषदांकडे शिल्लक असलेल्या टर्न की फी च्या रक्कमेतून खर्च करणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्र क्रमांक ३ दिनांक २६.२.२००९ नुसार प्राप्त झालेल्या माहितीनुसार ३१ मार्च २००८ अखेर जिल्हा परिषदकडे रुपये-५,८५,२१०/- टर्न की फी शिल्लक असतांना संयत्राच्या दुरस्तीवर खर्च झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत कृषी समितीचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

लेखाशिर्ष<br>
२४०१- बायोगॅस<br>
अपारंपारीक उर्जा राष्ट्रीय बायोगॅस.<br>
पं.स. मालेगांव.

**(क) <u>गोबरगॅस अनुदानाबाबत..</u>**

पंचायत समिती, बागलाण यांनी प्रमाणक क्रमांक ११ दिनांक १०.३.२००८ अन्वये रुपये-४,०००/- व प्रमाणक क्रमांक १५२ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रुपये-११,२००/- असे एकुण रुपये-१५,२००/- खालील लाभार्थ्यांनी अनुदानापोटी प्रदान केलेले आहेत.

| अ.क्र. | लाभार्थ्याचे नांव | गांवाचे नांव | गोबरगॅस संच अनुदान | शौचालय अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.दिलीप जेजेराम सूर्यवंशी | गांधीनगर | ३,५०० | ५०० |
| २ | श्री.अशोक पुंजा सूर्यवंशी | नवे निरपूर | ३,१०० | ५०० |
| ३ | श्री.देवराम मालजी बागुल | चाफापाडा | ३,१०० | ५०० |
| ४ | श्री.खंडु गबा कांदळकर | कोळीपाडा | ३,५०० | ५०० |
| | | **एकुण रुपये** | **१३,२००** | **२००** |

वरीलप्रमाणे एकुण ४ लाभार्थीना लाभ प्रदान करतांना शौचालय अनुदानांनुसार शौचालय बांधकाम पूर्ण केल्याबाबत नोंद करुन खाते उता-यांची प्रत प्राप्त करुन अनुदान प्रदान करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. शौचालय बांधकामाबाबत खाते उता-यावर नोंद घेवून पूर्तता दर्शवावी, तोपर्यत दिलेले अनुदान रुपये-२,०००/- तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
२४०३- अपारंपारीक उर्जा राष्ट्रीय बायोगॅस
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-२,०००/-

(विवरणपत्र क्रमांक ४ (ब) चा अ.क्र.७ पहा.)

## (ड) गोबरगॅस अनुदानाबाबत..

पंचायत समिती, पेठ अंतर्गत कृषी विभागाने सन २००७-०८ या वित्तीय वर्षात गोबर गॅस यंत्र बांधकामासाठी एकुण ५ लाभार्थ्यांना रुपये-१९,२००/- एवढे अनुदान वितरीत करण्यांत आले आहे. सदरच्या अनुदानांत रुपये-५००/- हे गोबरगॅस यंत्र बांधकामा बरोबर शौचालय बांधकाम ज्या लाभार्थ्यांनी पूर्ण केले असेल अश्या लाभार्थ्यांना अनुदान रुपये-५००/- देय आहे.

खालील लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यांत आले आहे.

(आकडे रुपयांत)

| अ. नं. | लाभार्थ्यांचे नांव/गांव | गोबरगॅस अनुदान | शौचालय अनुदान | एकुण वितरीत अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.एकनाथ गंगाराम महाले, आडगांव बु.// | ३,५०० | ५०० | ४,००० |
| २ | श्री.पंढरीनाथ सखाराम चौधरी, भायगांव | ३,५०० | ५०० | ४,००० |
| ३ | श्रीमती.शेवंताबाई कृष्णा सहारे, जुनोरी | ३,५०० | ५०० | ४,००० |
| ४ | श्री.भास्कर काशिनाथ भोये, उस्थळे | ३,७०० | ५०० | ४,००० |
| ५ | श्री.भाऊराव तुकाराम भोये, हनुमंतपाडा | ३,५०० | ५०० | ४,००० |
| | | **एकुण------** | **२,५००** | |

उपरोक्त लाभार्थ्यांना शौचालय अनुदान रुपये-५००/- प्रमाणे प्रदान करण्यांत आले आहे. प्रमाणकांसोबत संबधितांनी शौचालय बांधकाम केले बाबत संबधित ग्रामपंचायतीकडील ८

अ चा उतारा व त्यावर नोंदी बाबत खात्री न करताच अनुदान वितरीत केल्याने संबधित लाभार्थ्यांनी शौचालय बांधकाम केल्याची खात्री लेखा परीक्षणास करात आली नाही. संबधित लाभार्थ्याचे ८ अ चे उता-यांवर शौचालय बांधकाम केल्याची नोंद घेवून लेखा परीक्षणास अनुपालन दर्शवावे. तो पर्यत जिल्हा परिषद सेस लेखाशिर्षातून प्रदान खर्च रुपये-२,५००/- तात्पुरती अमान्य ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
२४०३- राष्ट्रीय बायोगॅस योजना
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-२,५००/-

(विवरणपत्र क्रमांक ४ (ब) चा अ.क्र.८ पहा.)

## (इ) राष्ट्रीय बायोगॅस योजनेच्या अकार्यक्षम अंमलबजावणीबाबत..

पंचायत समिती, इगतपूरीचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षात बायोगॅस संयत्र बसविणेकामी प्रमाणक क्रमांक २१ दिनांक २९.२.२००८ रक्कम रुपये-१५,५००/- व प्रमाणक क्रमांक ७४ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रुपये-५२,०००/- अन्वये प्रमाणकांमधील खालीलप्रमाणे २ लाभार्थ्यांना एकुण रुपये-८,०००/- इतके अनुदान दिले आहे.

| अ.नं. | लाभार्थ्यांचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | श्रीमती. जिजाबाई मोहन टोचे | ४,००० |
| २ | श्री. शिवाजी विठोबा गायकवाड | ४,००० |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) बायोगॅस संयत्राची तपासणी नोंदवही अपूर्ण असल्यामुळे आतापर्यत किती बायोगॅस संयत्राचा लाभ दिलेला आहे, एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला किंवा कसे ? बायोगॅस संयत्र चालु स्थितीत आहेत किंवा कसे, याबाबत नोंदवही अपूर्ण असल्यामुळे खात्री करता आली नाही.

२) आजपोवेतो बायोगॅस संयत्र दुरस्तीवर कोणत्याही प्रकारची तरतुद व खर्च केल्याचे दिसून येत नाही.

३) लेखापरीक्षण कालावधी पावेतो कोणत्याही लाभार्थ्यास लाभ दिल्यापासून ते सयंत्र चालु किंवा बंद आहेत अशा स्वरुपांचे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी तसेच कृषी विस्तार अधिकारी यांनी नोंदवहीमध्ये नोंदविलेले नसल्याने सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांना किती झाला याची खात्री करता येत नाही.

४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीएस-१०९७/प्र.क्र.१६९६/३१ दिनांक ३०.८.१९९९ नुसार बंद पडलेल्या अथवा नादुरस्त झालेल्या बायोगॅस संयत्राच्या दुरस्तीसाठी जिल्हा परिषदांकडे शिल्लक असलेल्या टर्न की फी च्या रक्कमेतून खर्च करणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्र क्रमांक ३ दिनांक २६.२.२००९ नुसार प्राप्त झालेल्या माहितीनुसार ३१ मार्च २००८ अखेर जिल्हा परिषदकडे रुपये-५,८५,२१०/- टर्न की फी शिल्लक

असतांना संयत्राच्या दुरुस्तीवर खर्च झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत कृषी समितीचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्त अभिप्रायांची पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दाखवावे.

लेखाशिर्ष
२४०३- कृषी विभाग
अपारंपारीक उर्जा राष्ट्रीय बायोगॅस.
पं.स. इगतपूरी

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- कृषी विभागाकडील अपूर्ण विहीरीबाबत..**

पंचायत समिती बागलाण यांचेकडील कृषी विभागाने सन २००७-०८ मध्ये खालील तपशिलानुसार जुन्या अपूर्ण विहीरीवर व नविन विहीरीवर खालील तपशिलानुसार खर्च करण्यांत आलेला आहे.

| अ.नं. | योजनेचे नांव | प्राप्त अनुदान | खर्च अनुदान |
|---|---|---|---|
| १ | विशेष घटक योजना (एस.एस.पी.) | ६,४०,००० | ६,४०,००० |
| २ | ओ.टी.एस.पी. | ५,५४,७७५ | ५,५४,७३७ |
| ३ | टी.एस.पी. | १३,१९,३३९ | १३,१९,२९२ |

**अपूर्ण व पूर्ण विहीरीवरील खर्चाचा तपशिल.**

| अ. नं. | योजनेचे नांव | ०६-०७ अखेर अपूर्ण विहीर संख्या | ०७-०८ मंजूरी विहीर संख्या | एकूण | ०६-०७ अखेर अपूर्ण विहीरी पूर्ण केलेली संख्या | ०७-०८ मधील नविन विहीर पूर्ण संख्या | एकुण पूर्ण विहीर संख्या | ३१.३.०८ अखेर अपूर्ण विहीरीची संख्या | मागील अपूर्ण विहीरी वरील चालू वर्षात केलेला खर्च | ०७-०८ मधील नविन विहीरीवर केलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष घटक योजना | ८ | १२ | २० | -- | ९ | ९ | ११ | १,१७,०९२ | ५,२२,९०८ |
| २ | ओ.टी. एस.पी. | ७ | ५ | १२ | ५ | ३ | ८ | ४ | ३,३६,३५६ | २,१८,३६१ |
| ३ | टी.एस.पी. | ४ | २७ | ३१ | ३ | २० | २३ | ८ | १,६४,५०० | ११,५४,७९२ |

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सन २००६-०७ अखेर विशेष घटक योजनेच्या ८ विहीरी अपूर्ण आहेत. सदरच्या विहीरीवर रुपये १,१७,०९२/- एवढा खर्च करुनही नविन विहीरीवर खर्च करण्या अगोदर अपूर्ण विहीरी पूर्ण करुणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

२)    ओ.टी.एस.पी. अंतर्गत ही २ विहीरी अपूर्ण आहेत. नविन विहीरीवर खर्च करणे अगोदर जून्या अपूर्ण विहीरीवर खर्च केलेला नाही.

३)    अपूर्ण एस.पी. विहीरीवर रुपये-१,६४,५००/- खर्च नोंदवूनही अपूर्ण ठेवल्यामूळे लाभार्थ्यांना योग्य फायदा झालेला नाही.

अ)    महाराष्ट्र शासन नियोजन विभाग विभाग आदेश क्रमांक नाशिक जाविका-१२९८/ प्र.क्र.१०४/रोहयो/१० दि १.७.१९९८ मधील परिच्छेद १७ व १८ नुसार विहीरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्यांचे आत सुरु करुन व पुढील १२ महिन्यांचे आत पूर्ण करावयाचे असतांना या प्रकरणी शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही.

ब)    उपरोक्त तपशिलनुसार प्राप्त अनुदान व त्या अनुषंगाने केलेला खर्च पहाता सन २००७-०८ या वित्तीय वर्षात एकुण ४० पूर्ण विहीरींचा पूर्णत्वाचा दाखला देयका सोबत जोडण्यांत आलेला आहे. परंतू योजनेच्या उदिष्ठानुसार विहीरींना पाणी असल्याबाबत भुजल सर्वेक्षण विकास योजना यांचा तपासणी अहवाल सादर न झाल्याने विहीरीच्या बांधकामावर केलेला खर्च योग्य असल्याचे प्रमाणीत व्हावे.

क)    विहीरींना लागलेल्या पाण्यामुळे किती लाभधारकांनी विज पंप मिळविणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे कोटेशन भरले अथवा कोटेशन मंजूर तसेच विद्युत पंप बसवून किती लाभार्थ्यांना योजनेचा लाभ झाला याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

ड)    कृषी विभागाने नविन विहीर मंजूर करणे पूर्वी जून्या अपूर्ण विहीरी पूर्ण करण्याचे उदिष्ठ विहीरी पूर्ण करण्याचे उदिष्ट सफल करावे. तसेच अंदाजपत्रकाप्रमाणे विहीरीचे आतील भिंतींच्या बांधकामावर खर्च करण्यांत आलेला नाही. बहुतांश खर्च हा विहीर खोदकामासाठीच करण्यांत आलेला आहे. पर्यायाने विहीर बांधकाम न केल्याने विहीर खचणे, ढासळणे व विहीर बुजणे असे प्रकार कालौघात होवू शकतो.

अंदाजपत्रकाप्रमाणे व तांत्रिकदृष्टया काम पूर्ण झालेले नसतांना पूर्णत्वाचे दाखले दिल्याने तांत्रिक अधिकारी यांनी आपली जबाबदारी योग्य रितीने पार पाडलेली नाही असे स्पष्ट होते दक्षता व गुणनियंत्रण विभागाचे अहवाल सर्वसाधारणपणे सभे समोर ठेऊन सभेचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्त अभिप्रायांचे पूर्तते अभावी जुन्या व नविन विहीरीवर केलेला खर्च रुपये-१३१९२९२/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
११- शेती
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये-१३,१९,२९२/-

(विवरणपत्र क्रमांक ४ (ब) चा अ.क्र.९ पहा.)

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- अपूर्ण विहीरीबाबत..**

पंचायत समिती, पेठ अंतर्गत कृषी विभागाकडील ओ.टी.एस.पी. या योजनेतून एकूण ४५ विहीरी हया सन २००७-०८ या वित्तीय वर्षात (सन २००६-०७ = १८ व २००७-०८ =

२७) पुर्ण करण्यांत आलेल्या आहेत. त्यावर एकुण रुपये-१९,३८,९४६/- एवढा खर्च केलेला आहे.

तसेच या अहवाला सोबत जोडण्यांत आलेल्या परिशिष्ट क्रमांक "८" मध्ये नमुद केल्याप्रमाणे आदिवासी उपयोजनांतर्गत ३ लाभार्थीनी विहीरी पूर्ण केलेल्या नाहीत. सदरच्या अपुर्ण विहीरीवर दिनांक ३१.३.२००८ अखेर रुपये-१,००,०००/- एवढा खर्च केलेला आहे.

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यांत येत आहे.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्रमांक नाशिक जविका-१२९८/प्र.क्र.१०४/ रोहोयो/१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहीरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशीतील दिनांकापासून दोन महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्यांचे आत पुर्ण करावयाचे असतांना या प्रकरणी शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही.

२) सर्व विहीरींची अंदाजपत्रके एक सारखीच तयार केलेली आहेत. यावरुन प्रत्यक्ष जागेवर जाऊन विहीरींचे अंदाजपत्रके तयार केली नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण जमिनीचे भुपृष्ठ सर्व स्तरांवर सारखे असु शकत नाही. त्यामुळे अंदाजपत्रके ही एकाच प्रकारची तयार करुन अनियमितता केलेली आहे.

३) विहीरींना लागलेल्या पाण्यामुळे किती लाभधारकांनी विज पंप मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे कोटेशन भरले अथवा कोटेशन मंजूर झाले याबाबतची माहिती तसेच किती लाभधारकांना विद्युतप पंप प्राप्त होऊन कार्यन्वित झाले, व त्याबाबत सिंचनाचा लाभ व तसेच लाभार्थीची प्रगती उंचावली याबाबतचा संबधित सक्षम अधिकारी यांनी ग्रामिण भागात वेगवेगळे योजनांचा लाभ देणे संदर्भात भेटी देतांना चौकशी करुन चौकशी अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाही.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता व्हावी. टि. एस. पी. अनुदान विहीर खर्चावर केलेला खर्च रुपये-२०,३८,९४६/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरते अमान्य करण्यांत येत आहे.

<u>लेखाशिर्ष</u><br>
११-शेती<br>
आदिवासी उप-योजना<br>
(टी. एस. पी. वेल) शासकीय अनुदान<br>
तात्पुरती अमान्य रुपये-२०,३८,९४६/-

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा भाग १० पहा.)

---

## <u>परिच्छेद क्रमांक १७ :- कृषी विभागाकडील विहीरी बाबत. (पंचायत समिती येवला)</u>

पंचायत समिती, येवला अंतर्गत कृषी विभागाने सन २००७-०८ मध्ये विशेष घटक योजनेतंर्गत ४८ पैकी ४३ विहीरी व ५ अपूर्ण विहीरींवर एकूण खर्च रुपये-२१,८३,९३४/- एवढा नोंदविलेला आहे. तसेच ओ. टी. एस. पी. ३ विहीरीसाठी रुपये- १,५०,०००/- एवढे अनुदान प्राप्त झाले होते. सदरच्या ३ ही लाभार्थ्यांनी पूर्ण करुन अनुदान १०० टक्के खर्च झालेले आहे.

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सर्व विहीरीचे खोदकाम करणे व बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये-५०,०००/- एवढया रक्कमेचे आहे म्हणजेच खोदकाम व बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करतांना तेथील भु-स्तर व भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन ठरविणे आवश्यक आहे. असे असतांना सर्व विहीरीचे प्राकलन एकसमान प्रकारचे असल्याने प्रत्यक्ष पाहणी अंती अंदाजपत्रके केली नसल्याचे स्पष्ट होते.

२) कृषी विभागाने नविन विहीर मंजूर करणे पूर्वी जुन्या अपूर्ण विहीरी पूर्ण करण्याचे उदिष्ठ सफल करावे. तसेच अंदाजपत्रकाप्रमाणे विहीरीचे आतील भितींच्या बांधकामावर खर्च करण्यांत आलेला नाही. बहुतांश खर्च हा विहीर खोदकामासाठीच करण्यांत आलेला आहे. पर्यायाने विहीर बांधकाम न केल्याने विहीर खचणे, ढासळणे व विहीर बुजणे असे प्रकार कालौघात होवू शकतात. अंदाजपत्रकाप्रमाणे व तांत्रिकदृष्टया काम पूर्ण झालेले नसतांना पूर्णत्वाचे दाखले दिल्याने तांत्रिक अधिकारी यांनी आपली जबाबदारी योग्य रितीने पार पाडलेली नाही असे स्पष्ट होते. याबाबत दक्षता व गुणनियंत्रण विभागाचे अहवाल सर्वसाधारणपणे सभे समोर ठेऊन सभेचे क्षमापन घ्यावे.

उपरोक्त अभिप्रायांचे पुर्तते अभावी खर्च रुपये-२३,३३,९३४/- हा शासकीय अनुदानांसाठी तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
११-शेती
विशेष घटक योजना
विहीर अनुदान
तात्पुरती अमान्य रुपये-२३३३९३४/-

(विवरणपत्र क्रमांक ४ चा ब चा भाग अ.क्र. ११ पहा.)

---

## परिच्छेद क्रमांक १८ :- कृषी विभाग अपूर्ण विहीरी बाबत.

पंचायत समिती सुरगाणा कडील दिनांक ३१.३.२००८ अखेर ओ. टी. एस.पी. योजनेतंर्गत विहीरींची कामे अपूर्ण आहेत. व त्या कामांवर रुपये-२८,१५,०८८/- खर्च करण्यांत आलेला आहे.

सन २००७-०८ वर्षात कृषी विभांगातर्गत प्राप्त अनुदानाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | योजेनेचे नांव | प्राप्त अनुदान | खर्च अनुदान | अखर्चित अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | ओ. टी. एस. पी. | ३७,३६,३८८ | २८,१५,०८८ | ९,२१,३०० |

१) ओ. टी. एस. पी. अंतर्गत विहीरींची कामे अपूर्ण असतांना सन २००७-०८ या वित्तीय वर्षात अखर्चित अनुदान रुपये-९,२१,३००/- जिल्हा परिषदेकडे परत पाठविण्यांत आले आहे. ही विसंगती असल्याने नियोजनचा अभाव दिसून येतो. या विहीरी अपूर्ण ठेवण्यांत लाभार्थी जबाबदार असतील तर त्यांचेवर विहीत दंडनिय कार्यवाही करावी. अथवा प्रशासनाच्या कर्तव्य दक्षते अभावी अनुदान परत गेले असेल तर जबाबदारी निश्चित व्हावी.

२)  अखर्चित रक्कम शासन सदरी भरणा करणे ऐवजी पंचायत समितीने दिनांक १४.३.२००८ रोजी धनादेश क्रमांक १४७३२६ अन्वये रक्कम रुपये-९,२१,३००/- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे पाठविलेली आहे. हे अखर्चित अनुदान विहीत मुदतीत शासनास परत केल्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे प्रमाणपत्र घ्यावे.

३)  महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्रमांक नाशिक जविका-१२९८/ प्र.क्र. १०४ दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहीरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्यांचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्यांचे आत पूर्ण करावयाचे असतांना या प्रकरणी शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. याबाबत प्रशासनाची अकार्यक्षमता स्पष्ट होते.

४)  अपूर्ण विहीरीवर शासकीय अनुदान रुपये-२८,१५,०८८/- खर्च होवून सुध्दा शासनाचा हेतु सफल झालेला नाही. आता नविन विहीरी सुरु करणे पूर्वी अपूर्ण विहीरी प्राधान्याने पूर्ण करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणांस दर्शवावे.

लेखाशिर्ष<br>
११-शेती<br>
अभिकरण योजना , सप्रयोजन अनुदान<br>
तात्पुरती अमान्य रुपये-२८१५०८८/-<br>
(पंचायत समिती सुरगाणा)

(विवरणपत्र क्रमांक ४ चा ब चा भाग अ.क्र. १२ पहा.)

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- विशेष घटक योजनेतून १०० टक्के अनुदानातून बैलगाडी, बैलजोडी व पाईप लाईन करणे..**

(अ)  कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक, यांचे आदेश क्रमांक विशेष घटक योजना/ ५५४/०८ दिनांक ३१.३.२००८ अन्व्ये रुपये-९१,०००/- चे प्राप्त अनुदान पंचायत समिती निफाड यांनी प्रमाणक क्रमांक १०५ दिनांक ३१.३.२००८ अन्वये एकूण ४ लाभार्थ्यांना वितरीत केले.

(ब)  तसेच कृषी विकास अधिकारी यांनी ओदश क्रमांक ५५६/०८ दिनांक ३१.३.२००८ अन्वये १२ लाभार्थ्यांसाठी बैलजोडी खरेदी करण्यासाठी रुपये-६९,८२०/- एवढे प्राप्त अनुदान प्रमाणक क्रमांक १०६ दिनांक ३१.३.२००८ अन्वये वितरीत करण्यांत आले आहे.

उपरोक्त अनुदान वितरणाबाबत खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१)  उपरोक्त आदेश क्रमांक ५५६/दिनांक ३१.३.२००८ या एकुण १२ प्रस्ताव मंजूर आहेत. त्यापैकी १० प्रस्तावाची प्रत्येक लाभार्थ्यास रुपये-५,१८२/- एवढे अनुदान वितरीत करण्यांत आले आहे.

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे नांव |
|---|---|
| १ | श्री. गोकुळ दादा बंदरे |
| २ | श्री. केरु कचरु डोकणे |
| ३ | श्री. सागर भालचंद्र अहिरे |

| | |
|---|---|
| ४ | श्री. शांताराम भिवराम वाघ |
| ५ | श्री. म्हसु सुखदेव गुढले |
| ६ | श्री. नारायण दगडु वैराळ |
| ७ | श्री. मनोहर जयवंत बनसोडे |
| ८ | श्री. किशोर दामू बनसोडे |
| ९ | श्री. संजय कारभारी गुढले |
| १० | श्री. फकिरा शंकर खडांगळे |

उपरोक्त लाभार्थ्यांचे बाबतीत प्रस्तावा सोबत जातीचे दाखले, शेत जमिनीचा सात / बारा व खाते उतारा घेण्यांत आलेला नाही.

२) तसेच उपरोक्त आदेशात श्री. माधव धनाजी वैराळ व शामराव भिमाजी पगारे यांना प्रत्येकी- ९,०००/- अनुदान बैल जोडी खरेदी प्रित्यर्थ वाटप करण्यांत आले आहे. पोहोच दोन्ही लाभार्थ्यांचे प्रस्तावा सोबत वरील प्रमाणे कागदपत्रे जोडण्यांत आलेले नाहीत.

३) श्री. रामदास आबाजी भोळे, पिंपळगांव नजिक, ता.निफाड यांना पाईपसाठी रु ९,०००/- एवढे अनुदान वाटप प्रकरणाची तपासणी केली असता ७/१२ चे उतारा पहाता विहीर अथवा सिंचनाचे साधान उपलब्धे बाबत नोंद नाही. तसेच तांत्रिक विभागाकडून अथवा कृषी अधिकारी यांनी कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले नाही. अथवा कृषी अधिकारी यांनी काम पूर्णत्वाचा दाखला प्रस्तावा सोबत नाही.

४) सदाशिव रामू साळवे, राहणार तळवाडे यांना बैलजोडी साठी रुपये-९,०००/- बैलगाडी साठी ६००० व पाईप लाईनसाठी ५,०००/- असे एकूण रुपये-२०,०००/- अनुदान वाटप करण्यांत आलेले आहेत. यासोबत जातीचा दाखला, महसूल विभागाकडील उत्पन्नाचा दाखला पाईप लाईन कार्यान्वित असल्याचा कृषी अधिकारी पंचायत समिती, निफाड यांचा दाखला दिलेला नाही. त्यामुळे योजना राबविली किंवा कसे याबाबत कृषी विकास अधिकारी यांनी तपासणी करुन प्रमाणीत करावे.

५) संदीप भास्कर सोनवणे, राहणार भरवस यांना पाईप लाईन साठी रुपये-९,०००/- अनुदान वाटप करण्यांत आलेले आहे. प्रस्तावा सोबत जोडण्यांत आलेला उता-यावर ७/१२ विहीर अथवा जलसिंचनाचे साधन असलेबाबत जातीचा उत्पन्नाचा दाखला, पाइप लाईन संदर्भात अंदाजपत्रक तसेच कृषी अधिकारी यांनी पूर्णत्वाचा दाखला तसेच योजना कार्यान्वित झाल्याचा दाखला आदि कागदपत्रे नाही.

६) माधव हिंगाना निरभवणे, राहणार करंजगाव यांचे प्रस्तावासोबत जातीचा दाखला नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- ओ. टी. एस. पी. योजना अनुदानातून १०० टक्के अनुदानांवर बैलगाडी, बैलजोडी व पाईप लाईन करणे..**

कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक, यांचेकडील आदेश क्र. ५५६/२००८ दिनांक ३०.३.२००८ अन्वये निफाड तालुक्यांतील लाभार्थी श्री. अशोक कडु कडाळे यांना १०० टक्के अनुदानावर प्रकरण मंजूर करण्यांत आले आहे.

पंचायत समितचे प्रमाणक क्रमांक १०७ दिनांक ३१.३.२००८ अन्वये सदरच्या लाभार्थ्यांस अनुदानाचे वाटप करण्यांत आलेले आहे.

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) कृषी विकास अधिकारी यांचे आदेशात अट क्रमांक १० नुसार क्षेत्रीय तपासणी अहवाल लाभार्थ्यांचे प्रस्तावा सोबत घेवून दप्तरी ठेवणे बाबत नमुद आहे.

क्षेत्रीय तपासणी अहवालांत ७/१२ उतारा जोडण्यांत आलेला आहे. परंतू सदरच्या उता-यांवर विहीर अथवा इतर जलसिंचनाबाबत नोंद नाही. तसेच पाईप संदर्भात तांत्रिक अधिकारी यांचेकडून अंदाजपत्रक तसेच काम पूर्णत्वाचा दाखला घेण्यांत आलेला नाही. अनुदान रुपये-४,५००/- चे विनियोगाबाबत कृषी विकास अधिकारी यांनी प्रमाणीत करावे.

२) अट क्रमांक ४ नुसार कृषी अधिकारी यांनी कामाची पाहणी केलेल्याचा दिनांक नमुद करुन पंचानाम्यांत समक्ष उपस्थित पंचाचे नांव व दिनांकासहीत स्वाक्षरी घेण्यांत यावी, मात्र या अटीच्या अनुषंगाने कार्यवाही झाल्याचे दस्त ऐवज प्रकरणासोबत नाहीत.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- मुदतबाहय प्रवासखर्च बिलांच्या प्रदानांबाबत..**

पंचायत समिती, सिन्नरचे सन २००७-०८ चे लेखा परीक्षण केले असता, खालीलप्रमाणे मुदतबाहय प्रवास खर्च बिलांचे प्रदान केल्याचे आढूळन आले आहे.

| अ. क्र. | प्रमाणक क्रमांक / दिनांक | रक्कम (रुपये) | तपशिल | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | १०४/ ३१.३.२००८ | ६६० | श्री. एस. बी. चिखले, कृषी अधिकारी (वि. घ. यो.) | एप्रिल २००० |
| २ | १०५/ ३१.३.२००८ | ९६७ | -- वरील प्रमाणे- | मे/जुन २००० |
| ३ | १०६/३१.३.२००८ | १,३३७ | -- वरील प्रमाणे- | जुन/जुलै २००१ |
| | **एकुण---** | **२,९६४** | | |

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४४ व ४५ नुसार मुदतबाहय प्रदाने अदा करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तसेच लेखा संहितेमधील नियम ५४ नुसार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी प्रत्येक खाते प्रमुखाने लगत पूर्वीच्या महिन्यात त्यांच्या कार्यालयांत मिळालेल्या बिलांचा गोषवारा व गेल्या महिन्याच्या शेवटी प्रलंबित असलेल्या बिलांची माहिती विहीत नमुन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावी अशी तरतुद आहे.

तथापी पंचायत समितीने वरीलप्रमाणे प्रलंबित बिलांची माहिती सादर केलेली नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी प्राप्त न करताच मुदतबाहय प्रवास भत्याच्या रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

सदरच्या प्रदानाबाबत संबधितांची जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये-२,९६४ वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
२४०१- पीक संवर्धन
पंचायत समिती - सिन्नर
अंतिम अमान्य रक्कम रुपये-२,९६४/-

(विवरणपत्र क्रमांक ४ (अ) चा अ.क्र. ४ पहा.)

**परिच्छेद क्रमांक २२ :- जातीचे वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर न करण्याबाबत..**

कृषी विभाग, जिल्हा परिषद नाशिक मधील खालील कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे अद्याप प्राप्त झालेली नाहीत.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | भिमसिंग नामदेव मगर | विस्तार अधिकारी ( कृषी) | एन. टी. | |
| २ | पंढरीनाथ रामचंद्र सांगळे | विस्तार अधिकारी ( कृषी) | एन. टी. | |
| ३ | राजाराम गोविंद चव्हाण | विस्तार अधिकारी ( कृषी) | एस. टी. | |
| ४ | प्रशांत बंडू पवार | कृषी अधिकारी | एस. टी. | |
| ५ | दिलीप रामेश्वर सोनकुशळे | कृषी अधिकारी | एस.टी. | न्याय प्रविष्ट |

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक मविसे-१०/ २००६/प्र.क्र.२६९/ आस्था-३ दिनांक ७ डिसेंबर २००६ मधील २(अ) नुसार शासकीय / निमशासकीय कार्यालये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांना त्यांच्या आस्थापनेवरील अनुसूचीत जाती , अनुसूचीत जमाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदांवर नियुक्ती / पदोन्नती देण्यापूर्वी त्या उमेदवारांच्या ( अधिकारी / कर्मचारी यांच्या) जात प्रमाणपत्रांची पडताळणी / जाती दाव्याची वैधता तपासून घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी अद्यापही जात प्रमाणपत्राची पडताळणी / जाती दाव्याची वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत, त्यांना दिनांक ३१.१२.२००७ पर्यत अशी प्रमाणपत्र सादर करावीत. या कालावधीत जातीच्या दाव्यासंबधी वैधता प्रमाणपत्रे सादर केले नाही तर अशा सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे जातीचे दावे ग्राहय धरणेत येवु नयेत तसेच वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय कोणत्याही अधिकारी / कर्मचारी नियुक्ती / पदोन्नती देण्यांत येऊ नये अशा तरतुदी आहेत. मात्र वरील कर्मचा-यांच्या बाबतीत अद्यापही उपरोक्त नियमान्वये कार्यवाही झालेली नाही. याबाबत मा. विभागीय आयुक्तांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्रमांक २३ :- अनुदान निर्धारणाबाबत.**

कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील सन २००५-०६ या वित्तीय वर्षापासून सहाय्यक संचालक (लेखा-२), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अद्याप अनुदान निर्धारण केलेले नाही.

ग्रामविकास विभाग, क्रमांक आरसीएन/३५७१/११४३/३१ दिनांक २७ नोव्हेंबर १९७५ अन्वये २४०१ पीक संवर्धन कृषी या लेखाशिर्षाखाली हस्तांतरीत व सहेतुक योजनांसाठी सन २००५-०६ ते २००७-०८ या वित्तीय वर्षाचे अनुदान मुल्य निर्धारण प्राप्त करुन अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- अंतर्गत दप्तर तपासणीचे उदिष्टपूर्तीबाबत..**

कृषी विभाग, जिल्हा परिषद नाशिकचे सन २००७-०८ चे लेखा परीक्षण केले असता कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिकचे अधिनस्त असलेली गट स्तरावरील कार्यालयांची वार्षिक अंतर्गत दप्तर तपासणी केलेली नाही.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १ दिनांक ५.२.२००९ अन्वये माहिती मागणी केली असता, सन २००७-०८ मध्ये कोणत्याच गट स्तरावरील कार्यालयांची वार्षिक अंतर्गत तपासणी केलेली नाही. असे लेखी उत्तर देण्यांत आलेले आहे.

नियंत्रक अधिका-याने वर्षभरात अंतर्गत तपासणीचे उद्दीष्ट पूर्ण करणे आवश्यक असतांना सन २००७-०८ मध्ये कोणत्याही कार्यालयाची अंतर्गत पडताळणी न करणे अत्यंत गंभिर बाब आहे. त्यामुळे अकार्यक्षमता व गैरव्यवहारास वाव मिळू शकतो. नियमिती दप्तर पडताळणी न केल्यामुळे लेखे अपूर्ण ठेवणे, कामांत दिरंगाई करणे इत्यादी अनियमितता घडू शकतात. याबाबत लेखा परीक्षणांत वारंवार आक्षेप नोंदवूनही त्याकडे दूर्लक्ष केले जात आहे. तरी मागील सर्व दप्तर पडताळणी करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापनासह अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- आक्षेप विवरणपत्र..**

किरकोळ स्वरुपांचे आक्षेपांची पूर्तत लेखा परीक्षण सुरु असतांना वेळोवेळी केलेली असल्यांस स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित केले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- विवरणपत्र..**

या अहवालासोबत आवश्यक ती विवरणपत्रे जोडली आहेत.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- लेख्यांची स्थिती..**

कृषी विभागांतील लेख्यांची स्थिती सर्व साधारणतः समाधानकारक आहे. विशेषतः लाभार्थी विषयक नोंदवहया अद्ययावत ठेवणे, त्यांनाअधिकृत वेबसाईटस व इतर सर्व विहीत माध्यमांद्वारे उचित प्रसिध्दी देणे या बाबींकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- अनुपालन व पोहच..**

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) अन्वये या लेखा परीक्षण अहवालांतहल आक्षेपांवरील अनुपालन, प्रस्तृत अहवाल प्राप्त झाले पासून चार महिन्याच्या आत, जिल्हा परिषदेच्या ठरावाच्या प्रतीसह व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने तीन प्रतीत या कार्यालयाकडे पाठविणेत यावे. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच देणेत यावी.

--स्वा--
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक.

**प्रत- सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (पत्राने)
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई.
३) मा. सचिव, कृषी व सहकार विभाग, मंत्रालय मुंबई.
४) मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
५) मा. आयुक्त, कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
७) मा. सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक.
८) मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.

**प्रत सस्नेह अग्रेषित-**

९) म. उपमुख्य लेखा परीक्षक ( पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, ६ वा मजला, नवीमुंबई.
१०) म. कृषी अधिकारी , कृषी विभाग, जिल्हा परिषद, नाशिक.

--स्वा--
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक.